# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७ प्रस्ताव क्रमांक : ४६ दिनांक:- २७/०३/२०२३**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२२-२०२३ चे सुधारित व सन २०२३-२०२४ चे मुळ अंदाजपत्रक

--*--

**प्रस्तावाचा मजकुर :-**

विनंती टिप्पणी देण्यात येते की, सन २०२१-२०२२ चे सुधारीत व सन २०२२-२०२३ चे मुळ अंदाजपत्रक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण २ महानगरपालिका, नगरपालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादींचे कामकाज यामधील मा.स्थायी समितीचे कामकाज (३) (के) अन्वये मान्यता झाल्याचे कायद्यान्वये अधोरेखीत झाले आहे. त्यामुळे सन २०२१-२०२२ चे सुधारीत व सन २०२२-२०२३ चे मुळ अंदाजपत्रक (मनपा शिक्षण विभाग शेअर्ससह) चा विषय मा.महानगरपालिका सभेपुढे ठेवण्यांत यावा हि विनंती.

**दिनांक १३/०३/२०२३ रोजी झालेल्या मा.स्थायी समितीच्या विषय क्रमांक १७० चा ठराव :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०२२-२०२३ चे सुधारित व सन २०२३-२०२४ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे .सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभे समोर पाहिले.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२२-२०२३ चे सुधारित व सन २०२३-२०२४ चे मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर सखोल चर्चा करणेत येवुन ही सभा मा.सदस्य यांनी केलेल्या सुचना तसेच दुरूस्ती व फेरफारसह शिफारस करीत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२२-२०२३ चे सुधारित व सन २०२३-२०२४ चे सालचे अंदाजपत्रकावर सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेप्रमाणे **(सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये)** दर्शविल्यानुसार अंदाजीत जमा खर्चाच्या रकमा फेरफार करणेस तसेच नागरिकांना महत्वपूर्ण नागरी सुविधा देण्यासाठी आवश्यक ती तरतुद करणेस ही सभा सर्वानुमते मंजूरी देणे बाबत शिफारस करीत आहे.

**तसेच**

* रिव्हीजन करणे करीता मे.स्थापत्य कन्सल्टंट प्रा.लिमिटेड, अमरावती या ठेकेदार संस्थेकडून रिव्हीजन पुर्ण झाल्यावर म.न.पा हद्दीमधील ज्या मालमत्ता धारकांना कर आकारणी झालेली नाही त्या सर्व मालमत्ता धारकांना कराची नव्याने आकारणी होणार असल्याने या करामध्ये वाढ होईल. **"सर्वसाधारण कर"** या लेखाशिर्षा अंतर्गत रूपये ३ कोटी रूपयांनी वाढ सुचविण्यात येत आहे.

* शहरातील इमारतींच्या संख्येमध्ये मोठया प्रमाणात वाढ होत आहे. त्या दृष्टीने अग्नीशमन विभागाकडील **"ना हरकत प्रमाणपत्र "** या लेखाशिर्षा मध्ये रू.२० लाखांनी वाढ करण्यात यावी.

* चितळे रोड येथील नेहरू मार्केटच्या ठिकाणी अदयावत शॉपिंग कॉम्प्लेक्स व भाजी मार्केट करीता वित्तीय संस्था /बॅकेमार्फत कर्ज उपलब्ध करून किंवा एफ.बी.टी /बी.ओ.टी तत्वावर बांधकाम करण्याचा प्रस्ताव तात्काळ सादर करावा.

* सावेडी गांवठाण येथील महानगरपालिकेच्या शॉपींग सेंटर (एन.सी.सी.कार्या .) या ठिकाणी अदयावत शॉपिंग कॉम्प्लेक्स करीता वित्तीय संस्था /बॅकेमार्फत कर्ज उपलब्ध करून किंवा एफ.बी.टी /बी.ओ.टी तत्वावर प्रस्ताव सादर करण्यात यावेत.

* "**अनाधिकृत बांधकाम नियमानुकुल करणे** "या लेखाशिर्षा मध्ये मागील तीन वर्षा मधील उत्पन्न पहाता या रू.२ कोटी ने वाढ सुचविण्यात येत आहे.

* "**नळधारकाकडून जमा पाणीपट्टी**" या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये १ कोटी २ लाखाने वाढ करण्यात यावी.

* "**मालमत्ता नांव नोंदणी फि** " या लेखाशिर्षा मध्ये नविन घरांना घरपटटी लागु करणे बाबत पाठपुरावा करून मालमत्ता धारकांच्या प्रॉपर्टी ज्यांची महानगरपालिकेकडे नोंद नाहीत. अशा प्रॉपर्टीची नव्याने वाढ होवून होणार आसल्याने रू.५० लाखांनी वाढ सुचविण्यात येत आहे.

* **"जाहिरात बोर्ड जागा भाडे "** या लेखाशिर्षाअंतर्गत जाहिरात बोर्ड बाबत राज्यसरकारने केलेल्या नियमांची अंमलबजावणी करून आकारणी दराची नियमावली लागु झाल्यानंतर या उत्पन्नमध्ये वाढ होणार असलयाने या लेखाशिर्षामध्ये रक्कम रूपये ५० लाख रूपयांनी वाढ करण्यात यावी.

* अहमदनगर शहरामध्ये हरित क्रांती होणे कामी वृक्षकरातुन जमा होणारी रक्कम लागवड व संवर्धन करणेकरीता येणा-या खर्चाची बीले त्यातुनच अदा करावे. इतर कामी करीता वृक्ष कराचे पैसे वापरता येणार नाहीत याबाबत दक्षता घ्यावी. वृक्षकरा पोटी जमा होणा-या रक्कमेकरीता स्वतंत्र बॅक खाते उघडुन यामध्ये वृक्षकराची रक्कम जमा करण्यात यावी.

* नवीन वैद्यकीय व्यावसायीकांचा शोध घेवून मुंबई नर्सिग होम ॲक्ट अंतर्गत फि पासून मिळणा-या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.या लेखाशिर्षा मध्ये रक्कम रु. १५ लाख वाढ करण्यात यावी.

* नोंदणी कृत हॉस्पीटला बांधकाम परवानगी व FSI नुसार मनपा हद्दीतील गरीब रुग्नासाठी उपचाराकरीता १०% बेड राखीव ठेवणे बंधनकारक आहे. त्यानुसार वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी याबाबतची अमलबजावणी करण्यात यावी.

* अहमदनगर शहर हद्दीमध्ये विविध ठिकाणी वाहन पार्किंग करता जागा उपलब्धतेनुसार पॉलिसी बनविण्यात यावी. ठेकेदार संस्थाची नेमणुक करुन वाहन पार्किंगची वसुल करण्यात यावी. काही भागात सम विषम तारखेनुसार पार्किंग करण्यात यावी.

* भुसंपादनासाठी नविन लेखाशिर्षक निर्माण करण्यात यावे. याकरिता स्वतंत्र बॅक खाते उघडण्यात यावे.

* अमृत २.०/नगरोत्थान योजना अनुदान-नविन लेखाशिर्षक निर्माण करुन रक्कम रु.१०० कोटी तरतुद दर्शविण्यात यावी.

* अमृत २.०/नगरोत्थान योजना मनपा हिस्सा नविन लेखाशिर्षक निर्माण करुन रक्कम रु.३० कोटी तरतुद दर्शविण्यात यावी.

* सिटी सर्व्हे. सावेडी गावठाण या लेखाशिर्षामध्ये शहर हद्दीतील सर्व उपनगराचा सिटी सर्व्हे होणेकरीता/ सिटी सर्व्हे. सावेडी गावठाण उपनगरासह असा नावात बदल करण्यात यावा.

* **"सामाजिक संस्थांना देणगी"** या लेखाशिर्षामध्ये रक्कम रूपये १० लाख तरतूद दर्शविण्यात यावी. रसिक ग्रुप अहमदनगर सांस्कृतिक महोत्सावाकरिता रक्कम रु.४ लाख, नगरजल्लोष या कार्याक्रमाकरीता रक्कम रूपये १ लाख ५० हजार रूपये व पटर्वधन चौक प्रतिष्ठाण (ट्रस्ट) अहमदनगर रक्कम रु.१ लाख ५० हजार देण्यात यावी. याबाबत संबंधीत संस्थाकडून कागदपत्राची पुर्तता करून प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी. सदरचा खर्च **सामाजिक संस्थांना देणगी** या लेखाशिर्षातंर्गत करण्यात यावा.

* महानगरपालिका सर्व कार्यालये व महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारती रेन वॉटर हारवेस्टींग करणेकरीता रक्कम रु.१० लाख तरतुद जलशक्ती अभियान राबविणे या अंतर्गत करण्यात यावी.

* म.न.पा.हद्दीमध्ये गॅस कंपनी मार्फत घरगुती गॅस पाईप लाईन टाकण्याचे काम लवकरच सुरू होणार असल्याने तसेच केबल टाकणे, पाण्याची लाईन टाकणे व दुरूस्त करणे, ड्रेनेज लाईन टाकणे व दुरूस्ती करता रस्ता फोडणे करिता शुल्क आकारले जाते त्यामुळे**" रस्ता फोडणे, जोडणे वसुली व बांधकाम इतर"** या लेखाशिर्षा मध्ये रूपये ५ कोटी रूपयांनी वाढ करण्यात यावी.

* मा.शासनाने पारित केलेल्या जी.आर.नुसार व एफ.एस.आय.देणे करीता **"अतिरीक्त चटई क्षेत्रे निर्देशांक पोटी प्रिमियम "**या लेखाशिर्षा मध्ये रू.२ कोटीने वाढ करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

* **"विकास भार निधीतुन खर्च "** या लेखाशिर्षाअंतर्गत रू.१ कोटी ५० लाखाने वाढ करण्यात यावी.

* **" बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा"** या लेखाशिर्षा मध्ये रू. ४७ लाख रूपयांनी वाढ करावी.

* **"रेखांकनमधील अंतर्गत सुधारणा (ले आउट धारक)"** या लेखाशिर्षामध्ये रू.५० लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे.

* हिंदुस्थानचे आराध्य दैवत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनावर बसलेला ब्रांझ धातुचा पुतळा तयार करून महानगरपालिकेच्या नविन प्रशासकिय इमारती समोरील जागेत नियोजित चबुत-यावर बसविणे बाबतची निविदा मा.स्थायी समिती मध्ये निविदा मंजूर झालेली असून श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळयाचे बॅकराउंड या कामा करीता रक्कम रूपये १ कोटी वाढ **"पुतळे बसविणे "**या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावी.एकुण रक्कम रू.३ कोटी ५० लक्ष दर्शविण्यात यावी.तसेच राष्ट्रपुरूष महात्मा ज्योतिबा फुले यांचा पुर्णाकृती पुतळा माळीवाडा वेशीमध्ये बसविण्यात यावा. महापुरूष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा मार्केट यार्ड चौकामध्ये बसविण्यात यावा,छत्रपती संभाजी महाराज
यांचा पुर्णाकृती पुतळा सावेडी भागातील प्रोफेसर चौक येथे बसविण्यात यावा या कामा करीता येणारा खर्च **"पुतळे बसविणे"** या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावा.

* शहर व उपनगररामध्ये **"नविन इलेक्ट्रीक पोल बसविणे"** या लेखाशिर्षा अंतर्गत २५ लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे.

* अनाधिकृत नळ कनेक्शन ची शोध मोहीम हाती घेवून उत्पन्नामध्ये वाढ करण्यात यावी. **"अनाधिकृत नळ निमानुकुल करणे "**या बाबत योजना जाहिर करण्यात यावी.यास्तव या लेखाशिर्षाअंतर्गत रू.१ कोटी २ लाखाची वाढ करण्यात यावी.

* **"नविन गटर"** या लेखाशिर्षका अंतर्गत तरतुदीमध्ये रक्कम रु.५० लाखाने कपात करण्यात यावी.

* **"वॉर्ड विकास निधी"** या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रू.२ कोटी ३२ लाख तरतुद करण्यात यावी. मा.सदस्य प्रभाग विकास स्वेच्छा निधी या लेखाशिर्ष अंतर्गत प्रशासनाने केलेली तरतुद अत्यल्प असल्याने मा.नगरसेवकांना आपल्या प्रभागामध्ये तातडीचे कामे करावी लागतात एकुण नगरसेवकांची संख्या विचारात घेता प्रत्येक नगरसेवकांस मा.सदस्य प्रभाग विकास स्वेच्छा निधी व "वॉर्ड विकास निधी" असे एकत्रित रू.१५ लाख प्रमाणे , कामे सुचविता येतील.

* **मा.महापौर शहर विकास निधी** रू.२ कोटी ५० लाख, **"मा.उपमहापौर शहर विकास निधी "**रू.१ कोटी ५०लाख, **"मा.स्थायी समिती सभापती शहर विकास निधी"** रू.५० लाखची तरतुद दर्शविण्यात यावी. **मा.सभापती,महिला व बाल विकास निधी** रू.१५ लाख दर्शविण्यात यावी. **मा.उप सभापती,महिला व बाल विकास निधी** रू.१० लाख दर्शविण्यात यावी. **मा.सभागृह नेता शहर विकास निधी** रू.५० लाख दर्शविण्यात यावी. **मा.विरोधी पक्षनेता शहर विकास निधी** रू.५० लाख दर्शविण्यात यावी

* प्रभाग क्र.१३ नालेगाव भागातील नानापाटील वस्ताद तालीम बांधणे व याकरीता जिम साहित्य खरेदी करणे या कामा करीता रू.४० लक्ष खर्च **"अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे "**या लेखाशिर्षा अंतर्गत भागविण्यांत यावा.

* **"वाढीव हद्दीतील पाईपलाईन टाकणे"** या लेखाशिर्षामध्ये रू.७० लाख वाढ करण्यात यावी.

* **"शहरी भागात पाईपलाईन टाकणे"** या लेखाशिर्षामध्ये रू.७० लाख वाढ करण्यात यावी.

* **सौ.पुष्पाताई अनिल बोरुडे, सभापती महिला व बालकल्याण समिती** यांचे प्राप्त पत्रानुसार मा.शासन निर्णयानुसार महिला व बालकल्याण समिती करीता एकुण अंदाजपत्रकाच्या ५% नियमानुसार करण्यात आलेली तरतुद रोख स्वरुपात करण्यात यावी.

* मा.केंद्र शासन व मा.राज्य शासन यांच्या मार्गदर्शनानुसार स्वच्छता अभियान राबविण्यात येते. शहर स्वच्छ होणेकामी घनकचरा व्यवस्थापन विभाग अंतर्गत अहमदनगर शहरातील चार प्रभाग समिती यांना प्रत्येकी एक **"गारबेज पिकर मशिन"** चार नग उपलब्ध करुन देण्यात याव्या. याकामी येणारा अंदाजे रक्कम रु.८० लक्ष खर्च १५ व्या वित्त आयोग (घनकचरा व्यवस्थापन) मधुन भागविण्यात यावा.

* महानगरपालिकेच्या मालकीचे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक या ठिकाणी सुसज्य ग्रंथालय उभारावे व स्मारकाची देखभाल दुरूस्ती सदरचा खर्च **"इमारत दुरूस्ती या लेखाशिर्षा"** अंतर्गत करण्यात यावा. या कामा करीता रक्क्म रूपये २५ लाखांची तरतुद मध्ये वाढ करण्यात यावी.

* पाणी पुरवठा साहित्य (खरेदी व रिपेअर) या कामा करीता रक्कम रूपये १ कोटींची तरतुद मध्ये वाढ करण्यात यावी.

* **"टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणे"** या लेखाशिर्षकात रक्कम रु.२ कोटीची वाढ करण्यात यावी.

* शहरातील प्रमुख चौक सुशोभिकरण करण्याच्या दृष्टिने खाजगी संस्था,सामाजिक संस्था,यांचे मार्फत कार्यवाही करण्यात यावी तसेच शहरातील प्रमुख रस्त्यावरील डिव्हायडर सुशोभिकरण करणे देखील आवश्यक असून त्यामुळे परिसर देखील सुशोभित होईल या करिता डिव्हायडर सुशोभिकरण खाजगी संस्था,कंपनी,सामाजिक संस्था यांना या कामी प्रवृत्त करण्यात यावे व त्यांचे मार्फत सुशोभिकरणास परवानगी देण्यात यावी.

**अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२२-२०२३ चे सुधारित अर्थ संकल्पामध्ये**

* **"टॅकरव्दारे पाणी पुरवठा करणे"** या लेखाशिर्षकात बीले अदा करण्याकरीता तरतुद संपल्याने रक्कम रु.१ कोटी २५ लाखाची तरतुद करण्यात यावी.

* **"दलितेतर वस्ती सुधारणा योजना"** या लेखाशिर्षकात रक्कम रु.२ कोटीची तरतुद करण्यात यावी.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०२२-२०२३ चे सुधारित अंदाजपत्रकातील तरतुदींची त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी.

सन २०२३-२०२४ अंदाजपत्रकाच्या प्रती छापून घेवुन अहमदनगर महानगरपालिका सदस्यांना देण्यांत याव्यात खर्च मंजूर.

वरीलप्रमाणे सुचविलेल्या दुरूस्त्या शिफारसीसह सन २०२२-२०२३ चे सुधारित व सन २०२३-२०२४ सालचे बाबवार अंदाजपत्रकास मान्यता व शिफारशी सह मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

ही अर्थसंकल्पावर शिफारशी करण्याकरीताची सभा असल्याने या सभेचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता या सभेतील ठरावानुसार कार्यवाही करण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. विनीत पाउलबुधे:-

अनुमोदक :- मा.श्री.प्रदीप परदेशी:-

ठराव सर्वानुमते मंजूर.

**सही**/-
उमेश (गणेश) खंडेराव कवडे
सभापती,
स्थायी समिति,
अहमदनगर महानगरपालिका.

चर्चा :

विषय क्रमांक 46 चे वाचन करण्यांत आले. मा.सभापती यांना विनंती की त्यांनी बजेट सादर करावे.

मा.सभापती व स्थायी समिती सदस्य यांनी अंदाजपत्रक सादर केले यानंतर मा.सभापती स्थायी समिती यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

**मा.श्री.अनिल शिंदे :** 1240 कोटी अर्थसंकल्प सादर केला स्थायी समितीने त्यात वाढ करुन 1387 कोटी 79 लाख केला आहे.

तीन दिवसांचा वेळ अभ्यासासाठी देण्यांत यावा.

**मा.महापौर मॅडम :** आजची सभा सहकुब करण्यांत येत असून दिनांक 29 मार्च, 2023 रोजी दुपारी 12.00 वाजता अर्थसंकल्पीय सभा घेण्यांत येईल.

बुधवार दिनांक 29 मार्च, 2023 दुपारी 12.00 वाजता अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभा सुरु.

**मा.श्री.शाम नळकांडे :** नूतन स्थायी समिती सभापती व सभागृह नेता यांचे अभिनंदनाचा ठराव या सभेत करावा.

**मा.श्री.अशोक बडे :** आत्ताच जी सूचना मांडली त्यास मी अनुमोदन देतो.

**मुख्यलेखाधिकारी श्री.शैलेश मोरे :** सन 2022-2023 चे सुधारीत व सन 2023-2024 चे मुळ अंदाजपत्रका संदर्भात आपण जमलो आहोत. स्थायी समितीने बजेटच्या वेळी सदस्यांनी केलेल्या सूचनानुसार दुरुस्त्या करुन हे बजेट आपण सादर केले आहे. बजेटची रुपरेषा सांगतो. 3 भाग आहेत जमेत महसुली जमा भांडवली जमा व दुबेरजी जमा अॅक्ट मधील तरतुदी या महसुली जमेत येतात. भाडवली जमेमध्ये शासनाकडुन मिळणारे निधी व अनुदान तसेच सुरक्षा अनामत रक्कम काम पूर्ण झाल्यानंतर ठेकेदारांना द्यावी लागते ती सुध्दा त्यात धरत असतो. महसुली मध्ये सर्वात मोठा वाटा घरपट्टीचा आहे त्यानंतर बॉम्बे नर्सिंग होम अॅक्ट व्दारे मिळणारे उत्पन्न यानंतर महानगरपालिकेच्या मालमत्ता व सेवा यापासून मिळणारे उत्पन्न यात येते.

उत्पन्नाचे लेखाशिर्ष वाचन केले.

भांडवली जमा आमदार निधी, खासदार निधी प्राप्त होतो. नाविन्यपूर्ण योजना दलितवस्ती सुधार योजना हद्दवाढ 15 कोटी आले आहेत. अमृत एक ची योजना चालू आहे. अमृत 2 चा सुधारीत डीपीआर शासनास सादर केला आहे.

भांडवली मिळणारे उत्पन्न योजनेवर खर्च भागवतो. स्थायी समितीने अंदाजे जमा 1384 कोटी बांधला आहे. मागच्या बजेटपेक्षा जवळ जवळ 500 कोटीने जादा आहे. सविस्तर तपशिल सभागृहाला देण्यांत येईल.

**अकौंट विभाग श्री.अनिल लोंढे :** अहमदनगर महानगरपालिकेचे सन 2023-2024 अंदाजपत्रक यापूर्वी सादर केले. 1384 कोटीचे आहे. पान नंबर 38 पासून सुरुवात.

**मा.श्री.कुमार वाकळे :** झाडावर मागच्या वर्षी किती खर्च केला. कोणत्या भागात केला.

**अकौंट विभाग श्री.अनिल लोंढे :** 7 लाख 40 हजार 450 खर्च झाला. दिनांक 09 मार्च 2023 अखेर 38 लाख जमा झाले आहेत.

**मा.श्री.कुमार वाकळे :** दरवर्षी 5000 झाडे लावायचे असे मागे ठरले आहे. वृक्षकर हा फक्त झाडासंदर्भात आहे. देशी झाडे, ऑक्सीजन देणारी झाडे लावावीत. पर्यावरणाचा समतोल साधला जाईल वृक्षकर स्वतंत्र खाते उघडून झाडावर खर्च करावा. वॉर्ड क्रमांक 1 ते 17 च्या नगरसेवकांच्या वॉर्डात खर्च करा. वृक्ष कमिटी कडून भारतीय झाडांची माहिती घ्या. वृक्ष लागवड झाली तर सवलत देता येईल का हे तपासून पहा. मागच्या वर्षी 27000 झाडे लावली वृक्षकराचे पैसे 17 वॉर्डात विभागुन द्या. शहरासाठी फायदा होईल. पर्यावरण हा विषय व्यवस्थीत हाताळावा दरवर्षी 15 फुटाची झाडे लावली त्याचा हिशोब केअर टेकरने करावा. नगरसेवकांना त्यात सामावुन घ्यावे. हरीत शहर करायला मदत होईल. वर्षभर आता पावसाळा झाला आहे. पर्यावरणाचा समतोल ठेवण्यासाठी नियोजन करावे. मा.आयुक्त, मा.महापौर यांनी पुढाकार घ्यावा. झाडे लावण्यासाठी सर्वांना प्रवृत्त केले पाहीजे.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** 5000 वृक्ष लागवडीचे टेंडरला मागच्या स्थायी समितीत झाडांना मंजूरी दिली आहे. यापुर्वीचा व इथुनपुढे वृक्षकर हा झाडांवर खर्च झाला पाहीजे इतरत्र गेला नाही पाहीजे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** मागच्या वर्षीचे शिल्लक पैसे खात्यावर शिल्लक आहेत का. 32 लाख कुठे वापरले 38 लाखापैकी 6 लाख खर्च झाले मागच्या वर्षीचे 32 लाख आहेत का. इतर विभागाचे पैसे दुसरीकडे वापरतो. मागच्या बैठकीत सांगतले होते स्वतंत्र खाते उघडतो.

**मुख्यलेखाधिकारी श्री.शैलेश मोरे :** तपासुन सांगतो. इतर ठिकाणी वापरता येत नाही. सेप्रेट अकौंट यावर्षी पासुन सुरु करु. आपत्कालीन परिस्थिती मध्ये मंजूरी घेवून इतर खात्याची रक्कम वापरतो.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** आता स्वतंत्र अकौंट ओपन करा.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** ब-याच वेळा इतर खात्याकडे वर्ग केले.

**मुख्यलेखाधिकारी श्री.शैलेश मोरे :** आपत्कालीन परिस्थितीत लाईट बीलासाठी वापरले आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :** सर्व साधारण कर किती सन 2023-2024 साठी किती अपेक्षित, सन 2022-2023 किती

**मुख्यलेखाधिकारी श्री.शैलेश मोरे :** सन 2023-2024 साठी 83 कोटी व सन 2022-2023 ला 56 कोटी, 9 मार्च 2023 अखेर वसुली 20 कोटी.

**मा.श्री.अनिल शिंदे :** सन 2022-2023 सालची 56 कोटी डिमांड होती 36 कोटी रुपये वसूल होत नसेल तर प्रशासनाने 1240 कोटी सादर केले. स्थायी समितीने 1387 कोटी सादर केले. 56 कोटीतले फक्त 20 कोटी वसुल झाले. योजनासाठी फुगीर आकडे केले. भुयारी गटर योजनेसाठी किती धरले. अमृत पाणीपुरवठा साठी किती अपेक्षित धरले. सुवर्ण जयंती नगरोत्थान साठी किती अपेक्षीत धरले. 50 कोटी कर्ज 300 कोटी मुलभुत सुविधा मध्ये 40 कोटी धरले. घरपट्टी अपेक्षित 87 कोटी धरले.

**मुख्यलेखाधिकारी श्री.शैलेश मोरे :** घरपट्टीचे पुर्नमुल्यांकन टेंडर काढले.

**मा.श्री.अनिल शिंदे :** 70-30 चे पैसे दिले का. आयुक्तांकडे ठेकेदार बीलासाठी चकरा मारतात.

**मुख्यलेखाधिकारी श्री.शैलेश मोरे :** अंदाजे 1 कोटी द्यायचे राहीले आहेत.

**मा.श्री.अनिल शिंदे :** तुमच्या सामान्य कर व पाणीपट्टीचे पैसे वसुल होत नाही. 800 कोटीचे फुगीर बजेट आहे. 100 कोटी घरपट्टी कशी वाढवणार कर दर वाढ बजेटमध्ये नसते.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** कर दर वाढीचे प्रस्ताव दिनांक 20 फेब्रुवारी पुर्वी का सादर केले नाही.

**मुख्यलेखाधिकारी श्री.शैलेश मोरे :** विभागाने कर दरवाढीचा प्रस्ताव सादर केला नाही. यावर्षी विलंब झाला.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** ज्या खात्याकडून माहिती आली नाही त्यांच्यावर कारवाई करा.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** जे जबाबदार असतील त्यांना शोकॉज काढा.

**मा.श्री.योगीराज गाडे :** मागच्या वर्षीचे जे असतील त्यांनाही जबाबदार धरा.

**मा.महापौर मॅडम :** जे कोणी जबाबदार असतील त्यांचेवर कारवाई करण्यांत येईल.

**मा.श्री.अनिल शिंदे :** मागील सभेचे इतिवृत्त मंजूर केले का. झालेल्या सभेचे इतिवृत्त मंजूर झाले पाहीजे ते झाले नसतील तर ही सभा कायदेशीर आहे का.

**नगरसचिव श्री.तडवी :** सदरची सभा कायदेशीर आहे. पीठासीन अधिकारी यांचेकडे इतिवृत्त कायम करणेबाबतचे विषय वेळोवेळी सादर केले आहेत.

**मा.श्री.अनिल शिंदे :** दुस-या सभेला मागच्या सभेचे इतिवृत्त सादर करावे लागते.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :** अर्थसंकल्पीय सभा ही विशेष सभा असते. या सभेला इतिवृत्त कायम करणे या विषयाची गरज नाही.

**मा.आयुक्त श्री.जावळे साहेब :** सदरची सभा ही विशेष सभा आहे. अर्थसंकल्पीय असल्याने या सभेत अंदाजपत्रकाचे विषया व्यतिरिक्त कोणता विषय घेत नाही. पुढील सर्वसाधारण सभेमध्ये सर्व इतिवृत्त मान्यतेसाठी घेणे कामी मा.पिठासीन अधिकारी यांचेकडेस सादर करणे बाबत मी नगरसचिव यांना सुचना करतो.

**मा.श्री.अनिल शिंदे :** 56 कोटी पैकी 20 कोटी वसुल झाले 36 कोटीचे काय केले.

**मूल्यनिर्धारक तथा करसंकलन अधिकारी श्री.बांगर :** सन 2022-2023 ची एकुण मागणी 56 कोटी मागील थकबाकी, 36 कोटी आहे. 20 कोटी वसुल आहे. सर्व कराची मागील 158 कोटी चालू व मागणी

**मा.श्री.अनिल शिंदे :** सन 2022-2023 या आर्थिक वर्षात किती वसुल झाला.

**मूल्यनिर्धारक तथा करसंकलन अधिकारी श्री.बांगर :** चालू मागणी 20 कोटी पैकी 13 कोटी वसुल झाली. एकुण 22.34 कोटी वसुल झाले मागणी वसुली 70% कोटी 20 कोटी 12 एकुण थकबाकी 36 कोटी आहे. 40 लाख मोबाईल टॉवरचे वसुली केले. मोबाईल टॉवर असलेली प्रॉपर्टी 53 मधील 7 असे एकुण 11 सील केले.

**मा.श्री.अनिल शिंदे :** पाणी कट करायला आले होते. तुम्ही त्यांना 3 कोटीचा चेक दिला. मागचे 36 आता 83 धरले एवढे वसुल करणार का.

**मूल्यनिर्धारक तथा करसंकलन अधिकारी श्री.बांगर :** सन 2003-2004 ला प्रॉपर्टीचे असेसमेंट झाले. त्यानंतर झाले नाही. अनयुजड प्रॉपर्टी असेसमेंट करुन वाढीव रक्कम मिळतील असे गृहीत धरुन रक्कम वाढली आहे. पुढच्या वर्षात 100 टक्के वसुलीचा प्रयत्न करणार आहोत.

**मा.श्री.रामदास आंधळे :** लोक अदालतवर किती खर्च झाला वसुलीच्या किती टक्के खर्च झाला.

**मूल्यनिर्धारक तथा करसंकलन अधिकारी श्री.बांगर :** दीड ते दोन कोटी वसुलीचे रक्कम होतो.

**मा.श्री.रामदास आंधळे :** वसुली झाली नाही तर कारवाई काय करणार.

**मूल्यनिर्धारक तथा करसंकलन अधिकारी श्री.बांगर :** न्यायालयात 20 कोटी, ओपन प्लॉट 33 बाकी, स्लम 18, गव्हर्नमेंट प्रॉपर्टी 10 कोटी, मोबाईल टॉवर 10 कोटी डिमांड.

एप्रिल महिन्यात थकबाकी वसुलीसाठी स्पेशन ड्राईव्ह घेणार आहोत प्रॉपर्टी सील करणे, नळ कनेक्शन बंद करणेची कारवाई करुन प्रभावीपणे कारवाई करणार आहोत.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :** बांगर यांच्यावर कारवाई कोण करणार कर्मचा-यांना हे दंड करतात यांना पूर्ण वेळ महानगरपालिकेने ठेवले आहे. पगार अहमदनगर महानगरपालिकेचा घेतात व राहुरी नगरपालिकेत काम करतात.  कर्मचा-यांना 3 हजार दंड करतात नगरकरांच्या करावर यांचा पगार होतो.

**मा.आयुक्त श्री.पंकज जावळे साहेब :** कर विभागाची सर्व साधारण कराचे वसुलीसाठी व संबंधित विभाग प्रमुख यांचेवर सुध्दा कारवाई प्रस्तावीत होवू शकते.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :** मी पत्र दिले होते यांची बदली करा.

**मा.आयुक्त श्री.पंकज जावळे साहेब :** मा.शासनाला तसा प्रस्ताव पाठवू.

**मा.श्री.योगीराज गाडे :** सन 2021-2022 रक्कम रुपये 19 कोटी.

कोरोना काळात जास्त जमा आहे. आता कमी वसुली झाली आहे. कोरोनासाठी बराच निधी महानगरपालिकेला मिळाला. कोव्हीड अनुदान बाबत खर्च सन 2019-2020, 2020-2021 त्यावेळेस निरंक खर्च दाखवला आहे. सन 2021-2022 रक्कम रु. 4 कोटी 34 लाख खर्च दाखवला. सन 2023-2024 ला 10 कोटी बजेट दाखवले. आता मागच्या वर्षी या वर्षी आता खर्च वाढवुन का दाखवला. औषधाचा खर्च वाढवला शासनाकडून बराच निधी येतो. नगरसेवकांना काही कळत नाही. येणा-या वर्षी 10 कोटी खर्च दाखवला. मागे एवढे खर्च झाले नाहीत. यावेळी एवढा खर्च का दाखवला. पान नंबर 62 वर नोंद आहे.

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :** कोव्हीड 19 अनुदानातून खर्च सन 2019-2020 ला अपेक्षित नव्हते . सन 2020;2021 ला कोव्हीड अनुदानातून खर्च प्राप्त झाला नव्हता. त्यामुळे 14 व्या वित्त आयोगातुन खर्च केला आहे. सन 2020-2021 मध्ये बुथ हॉस्पीटल व इतर कोव्हीड सेंटर चालू केले. एसडीआरएफ मधुन निधी प्राप्त झाला. कलेक्टर ऑफीसला 20 कोटीची मागणी केली त्यांनी 6.50 कोटी दिले. 4 कोटी 76 लक्ष हे 20 कोटी मिळणार हे गृहीत धरुन तरतुद केली आहे.  कोरोना काळातील देणे बाकी नाही भविष्यात शासनाचे आदेश प्राप्त झाले तर भविष्यात तयारी असावी म्हणुन तरतुद केली आहे.

**मा.श्री.योगीराज गाडे :** कोरोनावरील औषधाचा झालेला खर्च याची प्रत्येक नगरसेवकाला माहिती दिली पाहीजे हा खर्च कोठे होतो हे कळले पाहीजे.

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :** आपण केंव्हाही येवून पाहू शकता पारदर्शक कारभार आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :** पारदर्शक कारभार आहे म्हणता मग याप्रकरणी कोणाची चौकशी चालू आहे.

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :** शिवराष्ट्र सेनेचे नवसुपे यांनी तक्रार केली त्याचे पत्रावर चौकशी चालू आहे.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** पारदर्शक कारभार आहे म्हणता मग पेपर का देत नाही.

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :** कोरोनावर 5 खाते प्रमुखा मार्फत खर्च झाला आहे. माहिती सादर करणेबाबत मा.आयुक्त साहेबांनी एक पत्र सर्व विभाग प्रमुख यांना काढले आहे.

**मा.सौ.पल्लवी जाधव :** गुलमोहोर रोड वरील सुरभी हॉस्पीटलला एनओसी दिली ती पुर्ण बोगस आहे आयुक्त तुम्ही कारवाई करा.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** या संदर्भात शाकीर शेख यांचे तक्रारीवर अतिरिक्त आयुक्त यांनी अहवाल तयार केला असुन गोपनीय आहे. आयुक्त साहेब तपासून पाहतील.

**मा.सौ.पल्लवी जाधव :** अनधिकृत बिल्डींगची मान्यता तात्काळ रद्द करा. हे जर खरे असेल तर आपले कर्मचारी यांना निलंबीत करा. अनधिकृत बिल्डींग पाडून टाका.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :** पुणे शहराचे खासदार सन्माननीय गिरीष बापट यांचे दु:खद निधन झाले आहे त्यांना सभागृहात श्रध्दांजली अर्पण करावी अशी सूचना करतो.

**मा.श्री.संपत बारस्कर :** 5 हजार वृक्षांचे टेंडर प्रसिध्द झाले. यासाठी मोलाचे सहकार्य मा.महापौर, उपमहापौर, कुमारभाउ असतील मा.संग्रामभैय्यांच्या उपस्थीतीत मिटींग झाली त्या सर्वांचे अभिनंदन. खड्डे सुध्दा पकडले पाहीजे असे आम्ही म्हणालो. खड्डे व मार्किंग ही

जबाबदारी महानगरपालिकेची आहे. या वेळेत कराव्यात. पावसाळा संपूण उन्हाळा येईल असे होवू देवू नका. त्या एजन्सीला वृक्षकरातुन बील अदा करावे. फास्ट काम होईल. आपण या कामासाठी सहकार्य करावे. आपण आजपर्यंत वृक्षकमिटी बनविली नाही. आता ती बनवून जे इच्छुक असतील त्यांचा समावेश करावा. पान नंबर 38 अ.नं.14 चा चालू वर्षाची, मागच्या वर्षीची जमाखर्चाची माहिती द्या.

**अकौंट विभाग श्री.लोंढे :** संकलीत कराची पेंडींग 3 कोटी 69 लाख.

**मा.श्री.शाम नळकांडे :** घनकचरा व्यवस्थापनावर टोटल खर्च किती झाला.

**घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.के.के.देशमुख :** संकलीत करापोटी जो खर्च जमा होतो तो घनकचरा विभागाला 14, 15 व्या वित्त आयोगातुन खर्च करणेसाठी प्राप्त होतो. या निधीतुन पैसे खर्च नाहीत. डी.पी.आर. साठी 27 कोटी मिळाले. 14 व्या व 13 व्या वित्त आयोगातुन 13 कोटी मिळाले. ठेकेदार नेमणूक व वाहन खरेदी याकरीता खर्च केला आहे.

**मा.श्री.शाम नळकांडे :** वाहनातुन उत्पन्न किती मिळतो. जुन्या ठेकेदाराला किती वाहने भाडयाने दिली त्यापासून किती रक्कम मिळाली.

**घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.के.के.देशमुख :** सभा संपायच्या आत माहिती देतो.

**मा.श्री.शाम नळकांडे :** कोणती वाहने खरेदी केली.

**घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.के.के.देशमुख :** 2 जेसीबी, 2 पोकलेंड, 3 सेप्टीक टँक गाडया उपलब्ध, 6 कॉम्पॅक्टर खरेदी करण्याची प्रक्रीया चालू आहे. दोन दिवस जेसीबी दुरुस्तीसाठी बंद ठेवला. आता दोन्ही जे.सी.बी चालू आहेत. पोकलेंड घेवून 4-6 महिने झाले. पोकलेंड ड्रायव्हर उपलब्ध नसल्याने उभे आहेत.

**मा.श्री.शाम नळकांडे :** नालेसफाईवर पोकलंडव्दारे लाखो रुपये खर्च करतो. सहा महिने झाले आपले पोकलेंड येवून अजुन वापरत नाही. ठेकेदाराकडून सफाई करुन घेतो. संबंधित ठेकेदाराला भाडयाने देतायेत का नाही.

**घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.के.के.देशमुख :** कचरा डेपोवर ठेकेदाराला आपण सांगीतले पण तो घेत नाही. प्रशासनाला ड्रायव्हर मिळणे बाबत प्रस्ताव ठेवला आहे. डेपोवरील ठेकेदाराला आपला पोकलेंड वापरणे बंधनकारक नाही. जड वाहन तर 6-6 महिने उभे राहीले. अजुन 6 महिने ठेवला तर तो नादुरुस्त होईल. लवण साफ करायला वार्षिक किती खर्च होतो.

**मा.श्री.संपत बारस्कर :** मागे आम्ही स्थायी समितीमध्ये विषय घेतला ओढयात ले-आऊट मंजूर केले तो विषय आम्ही काढला. उद्या हे शहर ओढयात जायचे, त्यावेळी ते म्हणाले ते लवण दिसते याच्यावर किती खर्च झाला. नाले सफाईवर किती खर्च येतो.

**इंजिनियर श्री.सातपुते :** मेन मेन ओढयाकाठी 24 ते 25 लाख खर्च होतो.

**मा.श्री.संपत बारस्कर :** जेसीबी काय तासाने काम करतो.

**इंजिनियर श्री.सातपुते :** पोकलेंड 1600 रुपये तासाने घेतो. 2.10, 2.50 असे आहेत.

**मा.श्री.शाम नळकांडे :** आपले वाहने थप्पीला लावायचे फक्त भाडयाने घ्यायचे असे काही ठरले का?

**घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.के.के.देशमुख :** मी चार्ज घेतला 2-3 महिने झाले प्रस्ताव दिला आहे.

**मा.श्री.शाम नळकांडे :** आपले जेसीबी पोकलेंड पाणीपुरवठा विभागाला वापरता येवू शकतो. आपण तो वापर करीत नाही.

**मा.आयुक्त श्री.पंकज जावळे साहेब :** तात्काळ वाहन चालक उपलब्ध करुन देवू. एप्रिल पासून पोकलेंड जेसीबीचा वापर करण्यांत येईल.

**मा.श्री.संपत बारस्कर :** ठेकेदाराला लगेच ड्रायव्हर मिळाला असता तुम्ही मशिनरी घेवू नका. ठेकेदाराला संलग्न सहा लाखांच्या वस्तु भंगारात टाकता का. नागरिकांच्या खिशातुन खर्च होतो म्हणून लक्ष द्यायचे नाही का?

**मा.सौ.दिपाली बारस्कर :** आमच्या वॉर्डात गायत्री पार्क मध्ये पाणी येते ले आऊट आपण करुन देतो. ज्यावेळेस प्लॉट पाडता त्यावेळेस छोटे प्लॉट का करुन देता.ओढेच रहात नाही मग साफसफाई कशाची करतो.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** 39 मोठे ओढे आहेत. सर्व्हे नं.28-29 30-35 वर्षा पूवीचा आहे. 10 वर्षा पुर्वीचा महसूल विभागाने मंजूर दिली आहे. महसूल विभागाने नविन मंजूरी दिली आहे. जशी डेव्हलपमेंट होत गेली.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :** प्रत्येक सभेत हा विषय होतो. आयुक्त साहेब बोलले मी कारवाई करणार.

**मा.आयुक्त श्री.पंकज जावळे साहेब :** पावसाळयापुर्वी केले जाईल.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :** ओढयावर ले आऊट कसा पडतो. एकाच ठिकाणचे दाखवतो तसे.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** ओढया नाल्याची रुंदी फिक्स करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवला आहे. पाईप काढण्यासाठी, बांधकाम, पाणी पुरवठा, इलेक्ट्रीक लाईन आहेत.

**मा.श्री.संपत बारस्कर :** पाईप कैंव्हा काढणार.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** मा.आयुक्त सा ो यांचेशी चर्चा करुन तात्काळ सुरु करु. बंद पाईपचा लगेच प्रस्ताव सादर करतो. प्रस्ताव आज ठेवतो.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :** ओढे मोकळे करा.

**मा.श्री.विनीत पाअ ुलबुधे :** ओढयातील ले-आउट कैंव्हा रद्द करणार.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** पहिला टप्पा बंद पाईप काढणर आहोत.

**मा.आयुक्त श्री.पंकज जावळे साहेब :** ओढयावरील अनधिकृत बांधकामा संदर्भात 7 दिवसात कार्यवाही करण्यांत येईल. कुठल्याही कार्यवाहीसाठी नियोजन करावे लागते.

**मा.श्री.संपत बारस्कर :** 7 दिवसाचे आत कार्यवाही करावी.

**मा.श्री.योगीराज गाडे :** पावसाळयात नागरिकांच्या घरात पाणी जाते. गावडे मळा, गुलमोहोर रोडवरील घरात पाणी जाते त्यासाठी 2 कोटीचा निधीची तरतुद करा.

**मा.श्री.संपत बारस्कर :** आमच्या वॉर्डातील ओढया नाल्याच्या बाबतीत मला विचारात घ्या.

**मा.श्री.योगीराज गाडे :** पावसाळी गटारची व्यवस्था करण्याची आयुक्तांची जबाबदारी आहे. पंतप्रधान कार्यालयाला चुकीची माहिती देतात. तरतुद करता येत नसेल तर त्या लोकांच्या घरात पाणी गेले तर त्यांची घरपट्टी कमी करता येते. आम्हाला त्यांच्या रोषास सामोरे जावे लागते. पावसाळी गटार साठी 2 कोटी तरतुद करा.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** दोन्ही मिळून 2 कोटी तरतुद आहे.

**मा.महापौर मॅडम :** 2 कोटींची तरतुद करण्यांत येईल.

**मा.सौ.पल्लवी जाधव :** घनकचरा गाडी दिवसाआड येते.

**घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.के.के.देशमुख :** 15 फेब्रुवारी पासुन श्रीजी या एजन्सीला ठेका दिला आहे. यापूर्वीचे स्वयंभू एजन्सीचे काम चांगले होते. लेबर लोक गाडीच्या खाली उतरत नाहीत. कर्मचारी व वाहनांची कमतरता आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :** रोडला कच-याचे ढीग झाले ते भरले जात नाही. नागरिकांनी निवडून कशासाठी दिले आहे. केअर टेकरला दिसत नाही का?

**मा.सौ.पल्लवी जाधव :** सीसी टीव्ही बसवा कचरा टाकणा-यांवर कारवाई करा.

**मा.श्री.कुमार वाकळे :** पालिकेचे कर्मचा-यांचे हे काम आहे. आम्ही ज्यावेळेस असे फोन करणार मग ते गाडी पाठवणार. किती चिकन वाल्यांवर कारवाई केली. गोण्यात भरुन बंद करुन रस्त्याचे कडेला टाकतात. तुमचे काम नाही का फिरायचे. माझ्या भागात कुठे कचरा आहे.

**घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.के.के.देशमुख :** 8 दिवसापुर्वी तुमच्या भागात आलो होतो. हायवेच्या ठिकाणी ढीग होते. बोल्हेगांव रोडवर स्पॉट दिसले.

**मा.श्री.कुमार वाकळे :** मी शंभर वेळेला फोन केले रेणुकानगर, संभाजीनगर, गणेशनगर, म्हस्के कॉलेज जवळ कचरा आहे. नदीच्या कडेला कचरा आहे. प्रत्येक सभेत आपण बोलायचे हे नंतर आपसात टाळया देवून सोडून देतात. ज्या गोष्टीला निधी लागत नाही  त्या गोष्टीही होत नाही. गाडया येत नाही हे पहात नाही. वेस्ट बांधकाम मटेरियल टाकणा-यांवर कारवाई करण्यासाठी सांगीतले पण कारवाई होत नाही. गाडी पकडली की डिपार्टमेंटचा माणूस सांगतो. वाकळे साहेबांना सांगा. आम्ही गाडी सोडून देतो. एवढा खर्च घनकच-यावर करतो मग आपण करतो काय

**घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.के.के.देशमुख :** ठेकेदाराकडे गाडया कमी आहेत.

**मा.श्री.शाम नळकांडे :** थ्री स्टार कशामुळे मिळाले. कचरा कुंडी मुक्त शहर झाले म्हणून मिळाले. ती दंडात्मक कारवाई केली का. ठेकेदाराचे कामाचे एसआय, सीएसआय च्या रिपोर्ट मध्ये काय आहे. बील सादर करतांना एसआय,सीएसआय चे रिपोर्ट सादर केले का? 4-4 दिवस गाडी येत नाही. गाडीवरुन कचरा फेकतात. ढिगारे उचलले जात नाहीत. किती वाजेपर्यंत कचरा संकलन होते. दंडात्मक अटीशर्ती आहे का? पहिल्या ठेकेदाराला 12 वाजेपर्यंत ढीग उचलायला पाहीजे अशी तरतुद होती. आपल्या 62 गाडया दिल्या. जुन्या ठेकेदाराला वाहने दिली तीच वाहने आत्ताच्या ठेकेदाराला दिली का.

**घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.के.के.देशमुख :** 62 वाहने दिली. 62 चालू आहेत. स्वत:ची वाहने नाहीत.

**मा.श्री.कुमार वाकळे :** दोन महिने झाले ठेका घेवून मग त्याला गाडया घेता येत नाही मग ठेका घेता कशाला. सगळे यांना माहिती आहे. आपण इथे बोलायचे मग हे ठेकेदाराला सांगणार. ठेकेदाराकडून हप्ते घ्यायचे काम बंद करा. ठेकेदारावर काय कारवाई केली.

**मा.श्री.शाम नळकांडे :** किती वाहने बंद आहेत.

**घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.के.के.देशमुख :** सर्व वाहने चालू आहेत.

**मा.श्री.शाम नळकांडे :** त्या ठेकेदाराला काय अटी व शर्ती टाकल्या ते सांगा.

**उपायुक्त श्री.डांगे :** संबंधित ठेकेदाराने घरोघरी जावून वर्गिकरण करुन कचरा जमा करणे बंधनकारक आहे.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :** गेली 5 वर्षे झाली ओला व सुका कचरा वेगळा केला जात नाही. कंम्पार्टमेंट केलेले नाहीत.

**उपायुक्त श्री.डांगे :** कंम्पार्टमेंट केलेले आहेत.

**मा.श्री.कुमार वाकळे :** एस.आय व केअर टेकरचे काम काय आहे. डिपार्टमेंट कोणतेही राहू हे कर्मचारी काम करीत नाही. पाणी पुरवठा, इलेक्ट्रीक विभाग असो. मा.श्री.शाम नळकांडे : एस.आय. व सीएसआय चे रिपोर्ट नसतानाही बील पुढे सबमीट केले जाते. ठेकेदार नगर शहर स्वच्छ राखण्यासाठी काय उपाययोजना करणार?

**उपायुक्त श्री.डांगे :** एकुण गोळा होणा-या कच-यावर 2150 दराने दिला. पहिल्या ठेकेदारा पेक्षा 1650 रुपये जास्तीने दर दिला आहे.

**मा.श्री.शाम नळकांडे :** आपण दरवाढ करुनही हा ठेकेदार व्यवस्थीत काम करीत नाही.

**उपायुक्त श्री.डांगे :** पार्टीशियन करुन दिले त्याचा ड्रायव्हर व असिस्टंट पाहीजे असे 20 माणसे एस्ट्रा दिली आहेत.

**मा.श्री.शाम नळकांडे :** घनकचरा व्यवस्थापन किती दिवसात व्यवस्थीत करणार हे आयुक्तांनी सांगावे. काय उपाययोजना राबविणार. किती दिवसात संपूर्ण कचरा उचलणार ते सांगा.

**मा.श्री.योगीराज गाडे :** वर्क ऑर्डर दिल्यानंतर अटीशर्तीनुसार काम होणार नसेल तर दंड आकारणार का. ब्लॅकलीस्त करा.

**मा.श्री.मनोज कोतकर :** इथुन पुढे जर नियोजन होणार असेल तर महासभा आयोजित करा. अन्यथा करु नका. कचरा हा विषय नाही. लाईटची तशी, पाण्याची तशी परिस्थीती, तशीच परिस्थिती रस्त्याची, 300 लोकांना कुत्रे चावले हे कुठेतरी थांबले पाहीजे. आम्ही आमच्या घरचे प्रश्न येथे मांडत नाहीत. मी शाळेचा प्रश्न गेले 2 वर्षे झाले मांडतो. शाळेकडे लक्ष द्या निधी उपलब्ध आहे. सर्वजण शाळेची परिस्थिती पहा चांगल्या संस्था आहेत. त्यांना बोलवा. लोक फुकट करायला तयार आहेत. बाकीच्यांच्या चुकांमुळे सर्वजणांना भोगावे लागते.

**मा.श्री.कुमार वाकळे :** कुत्रे धरतच नाही. पिसाळलेले कुत्रे मारले आहेत का ?

**मा.श्री.मनोज कोतकर :** कुत्र्याचे विषय आमच्याकडे जबाबदारी द्या पाणी योजनेवर आम्ही केले. यावर ही करु.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :** सगळया विभागाच्या बैठका घ्या. तंबी द्या.

**मा.श्री.मनोज कोतकर :** बारीक विचार या गोष्टींचा झाला पाहीजे. नाहीतर आम्ही येणार नाही.

**मा.श्री.कुमार वाकळे :** त्या दिवशी मी मोर्चा आणला त्या दिवशी जे जे मला लेखी दिले त्यातले कोणते काम झाले. ते अधिका-यांनी सांगावे.

**इंजिनियर श्री.सातपुते :** रिपेअरींगचे काम ठेकेदाराकडुन लगेच चालू केले. एस्टीमेटचे काम गणेश चौकातले फेज-2 चे काम चालु केले.

**मा.श्री.कुमार वाकळे :** हेडवॉलमनला हे दम देतात. मटेरियलची लिस्ट देवू नका. मी माझ्या घरी घेवून जातो का. मग कोणाला द्यायचे.

**इंजिनियर श्री.सातपुते :** मी कोणाला बोललो नाही.

**मा.श्री.कुमार वाकळे :** पाणी का येत नाही.

**इंजिनियर श्री.सातपुते :** या महिन्यात 12 वेळा लाईटचा फॉल्ट होता.

**मा.श्री.कुमार वाकळे :** तुम्ही मटेरियल देता का. महामुनी बोलले निकम साहेब बोलले वाकळेचे काम घ्यायचे नाही. मी दुश्मन आहे का तुमचा. मी माझ्या प्रभागातुन 2.5 कि.मी. राहायला आहे. तुमचा कर्मचारी म्हणाला वाकळे साहेब कोठेही लाईन टाकायला सांगतात.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :** मटेरियल द्यायचा आमचा विषयच येत नाही. प्रभाग अभियत्यामार्फत साहित्य दिले जाते.

**इंजिनियर श्री.सातपुते :** मटेरियल मिळत नाही. हे सत्य आहे. ठेकेदाराचे बील मिळत नाही त्यामुळे तो पुरवठा करीत नाही. सर्वच भागात पाणी प्रश्न आहे. तुमची कामे स्पीडने होतात.

**मा.श्री.कुमार वाकळे :** फेज-2 चे कनेक्शन दिले पण त्यातल्या ह्या गुंडया काढल्या नाही. त्यामुळे पाणी येत नव्हते. वॉलमनला हे कळत नाही का. त्याची कारवाई कोणावर करायची.

**इंजिनियर श्री.सातपुते :** लाईन चार्ज करुन द्यायची जबाबदारी ठेकेदाराची आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :** कनेक्शनचे काम दुस-याकडे दिले आहे.

**इंजिनियर श्री.सातपुते :** ज्या ठेकेदाराने काम केले त्या ठेकेदारावर कारवाई करु.

**मा.श्री.कुमार वाकळे :** तुमचा वॉलमन मुकबधीर आहे का ? मी दिवसभर तेथे होतो. त्यांनी सांगीतले नाही का ? ठेकेदाराला सांगा.

**इंजिनियर श्री.सातपुते :** उद्या सकाळी ठेकेदाराचे माणस आली पाहीजेत.

**मा.श्री.मनोज कोतकर :** केडगांव उपनगरात पाणी पुरवठा कमी होतो. 53 हद्दीत 12 इंची लाईन जोडण्याचे काम सुरु आहे. कोणाच्या अधिकारात परमिशन दिली. आमचे पाणी का दिले. आधीच आम्हाल सहा-सहा दिवस पाणी नाही.

**इंजिनियर श्री.गाडळकर :** स्वखर्चाने पाईपलाईन टाकणेसाठी प्रभाग अधिकारी यांचे मार्फत परवानगी दिली जाते. त्यानुसार काही परवानगी दिली आहे किंवा कसे या बाबत तपासुन माहिती देण्यांत येईल.

**मा.सभापती स्थायी समिती श्री.गणेश कवडे :** सभागृहात झालेल्या चर्चे नुसार मा.शासनाकडून विविध विकास कामांसाठी विविध योजने अंतर्गत महानगरपालिकेस निधी मंजूर करण्यात येतो. सन 2022-2023 व 2023-2024 या आर्थिक वर्षासाठी महानगरपालिकेस प्राप्त होणा-या मुलभूत / प्राथमिक सोयी सुविधा विकास निधी, रस्ता अनुदान, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर/राज्यस्तर), आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना, अल्पसंख्याक बहुलक्षेत्र विकास निधी, नागरी दलितेतर विकास निधी, नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत निधी, 15वा वित्त आयोग तसेच महानगरपालिका निधी व इतरही मा.शासनाच्या महानगरपालिकेस प्राप्त होणा-या निधीतील कामे सुचित करण्याचा अधिकार मा.महापौर यांना देण्यात यावा.

**मा.श्री.शाम नळकांडे :** यास मी अनुमोदन देत आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :** यास मी अनुमोदन देत आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :** मतदान घ्या. माझा निषेध नोंदवा.

**मा. महापौर मँडम :** मा.सदस्यांनी सुचविल्यानुसार मा.शासनाकडून विविध विकास कामांसाठी विविध योजने अंतर्गत महानगरपालिकेस निधी मंजूर करण्यात येतो. सन 2022-2023 व 2023-2024 या आर्थिक वर्षासाठी महानगरपालिकेस प्राप्त होणा-या मुलभूत / प्राथमिक सोयी सुविधा विकास निधी, रस्ता अनुदान, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर/राज्यस्तर), आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना, अल्पसंख्याक बहुलक्षेत्र विकास निधी, नागरी दलितेतर विकास योजना निधी, नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत निधी, 15वा वित्त आयोग तसेच महानगरपालिका निधी व इतरही मा.शासनाच्या निधीतील कामे सुचित करण्याचा अधिकार मा.महापौर यांना देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :** मी गाडळकरांना सूचना दिल्या. अनधिकृत असेल तर कारवाईच्या सूचना दिल्या.

**मा.श्री.मनोज कोतकर :** केडगांव भागात टँकर आला पाहीजे.

**मा.श्री.अनिल शिंदे :** अमृत योजना माहिती द्या.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :** अमृत योजनेतील पाईप लाईनचे काम पुर्ण झाले असुन पंपिंग मशिनरी बसविणेत आली आहे. ट्रान्सफार्मर आहे. पंपाचे इन्स्टॉलेशन झाले. मोटार संदर्भात इन्स्पेक्शन झाले. उद्या मोटार येतील. सात-आठ दिवसात ट्रायल घेता येईल.

**इंजिनियर श्री.गणेश गाडळकर :** अमृत योजनेतील पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत झाल्यानंतर मुळाधरण येथील पंप हाउस मध्ये स्टॅण्ड बाय म्हणुन 725 एच.पी.चा पंप व मोटार व अनुषंगिक विद्युत उपकरण घेणे योग्य राहील.

प्रकल्प विभागामार्फत एलएमओ प्लॅन्ट व सी अॅण्ड डी वेस्ट डिमोलिशन ही प्रकल्प उभारली आहेत. सदरचे प्रकल्प चालविणे व देखभाल दुरुस्ती साठी अनुक्रमे रुपये 20 लाख व 50 लाख इतकी तरतुद करणे आवश्यक आहे.

पाणी योजनेचे हायड्रोलिक मॉडेलिंग करणे या साठी सद्यस्थितीत रु.25 लाख इतकी तरतुद आहे. परंतु या कामासाठी निधीची आवश्यकता असल्याने 50 लाखाची तरतुद करण्यांत यावी.

**मा.श्री.सचिन शिंदे :** कल्याण रोडला दिवसा-आड पाणी पुरवठा मिळणार का. आम्हाला जर पुढच्या आठवडयात दिवसाआड पाणी मिळणार नसेल तर पुढच्या महिन्या भरात नगरसेवक पदाचा राजीनामा देणार.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :** पाणी उपलब्ध होईल तेवढा पुरवठा करतो.

**मा.श्री.शाम नळकांडे :** कल्याण रोडवर अन्याय का. लाईटची अडचणी आल्या तर 10-12 दिवसावर पाणी भेटते.

**मा.श्री.सचिन शिंदे :** 15 दिवसात जर दिवसा आड पाणी पुरवठा केला नाही तर आम्ही आंदोलन करु

**मा.श्री.शाम नळकांडे :** अगोदर दिवाळी म्हणाले. नंतर 26 जानेवारी म्हणाले आमची नागरिकांची तळमळ आहे. आम्ही नगरसेवक पाणी देवू शकत नाही. नगर शहराला 12 दिवस पाणी द्या बरं.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :** कल्याण रोडला दोन ठिकाणाहून पाणी पुरवठा करतो. बायपास रस्त्याच्या डाव्या व उजव्या बाजुने शहराचा पाणी पुरवठा पुर्णपणे लाईटवर अवलंबुन आहे. वसंतटेकडी येथे पाणी यायचे बंद होते. लाईट आल्यावर पाणी पुरवठा पुर्ववत होण्यासाठी दोन ते अडीच तास लागतात. महिना भरात 12 ते 13 वेळा वीज पुरवठा खंडीत झाला. शहरातील गॅप वाढवला तर कल्याण रोडचा गॅप वाढतो.

**मा.श्री.शाम नळकांडे :** गॅप टाकल्यानंतर 20 दिवसांनी पाणी पुरवठा होतो. त्याचा लोड आमच्यावर येतो. तुम्ही नगर शहराचा पाणीपुरवठा सुरळीत केला तर आमचा पाणीपुरवठा व्यवस्थीत होईल.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :** अमृत योजनेत पंप मोटार साठी सहा सहा महिने वेटींग आहे. मोटार आज संध्याकाळी निघतील.

**मा.श्री.शाम नळकांडे :** अमृत योजनेची टेस्टींग कधी होईल. स्वतः नगरसेवक असुन आठ दिवसांनी पाणी घेतो.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :** पंधरा एप्रिल पर्यंत टेस्टींग करण्यांत येईल.

**मा.श्री.शाम नळकांडे :** टँकरचा पाणीपुरवठा विस्कळीत झालेला आहे. नागरिक वैयक्तीक फोन करतात. टँकर संदर्भात काय उपाययोजना करणार.

**इंजिनियर श्री.गाडळकर :** गेल्या आठ दिवसांपुर्वी चार गाड्या बंद पडल्या आहेत. तीन दिवसांत चारही गाड्या होत्या त्या रेग्युलर झाल्या चार दिवस गाडया बंद होत्या.

**मा.श्री.शाम नळकांडे :** ठेकेदाराला खेप वाढवायला सांगा. सुट्टी घेतात.

**इंजिनियर श्री.गाडळकर :** पाचवी ट्रीप देण्याचा प्रयत्न करु.

**मा.महापौर मॅडम :** एक टँकर वाढवुन द्या एक खेप वाढवुन द्या.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** मा.आयुक्त साहेब वाहतुक शाखा व मा.आमदार यांचे उपस्थितीत झालेल्या बैठकीत वाहतुक कोंडी बाबत विषय मांडला. प्राधिकृत महानगरपालिका यांनी संयुक्त टीम करावी. त्या ठिकाणी एजन्सी नेमूण एक उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होवू शकतो याचे नियोजन करावे.

दुसरे महानगरपालिकेच्या ज्या जागा आहेत त्या ठिकाणी पार्किंगची सोय करण्यांत यावी महानगरपालिकेस उत्पन्न मिळेल.

तिसरे झाडे मोडले की ते उचलायची जबाबदारी कोणी घेत नाही. त्याची एक यंत्रणा उभारावी. बांधकामाचे ढिगारे उचलले जात नाही त्याची स्वतंत्र टीम नेमावी त्या टिमला जेसीबी ट्रॅक्टर द्यावे. या नगर शहराच्या नागरिकाला वाहतुक कोंडीला सामोरे जावे लागते त्याची उपाययोजना करावी. एमएसईबी जे झाड तोडते ते रस्त्यावर आणून टाकतात.

पाणीपुरवठया बाबत महिन्याभरापासुन ठेकेदाराकडे काम करणारा कर्मचारी कामावर नाही. आपण काही कर्मचारी घेणार आहोत का.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :** आउट सोर्सिंगच्या माध्यमातुन कर्मचारी घेतले त्यांचा ठेका संपत आला आहे. एकदोन दिवसात नविन ठेकेदाराला वर्क ऑर्डर दिली की पुर्वी सारखेच कामे सुरु होतील. चार-पाच दिवसात पुर्ववत होतील. पार्किंग संदर्भात डी.पी.आर.तयार केला आहे ते धोरण ठरवण्यासाठी पुढे महासभेत विषय आला की ते धोरण अॅडॉप्ट करण्यासाठी खाजगी संस्था नेमणार.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** नगरसेवक निधीतुन सी सी टिव्ही बसविण्यासाठी काही रक्कम उपलब्ध करावी.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :** कर्मचा-यांना 7 वा वेतन आयोग कधी लागू करणार. राज्यभरात लागू केला आहे.

**उपायुक्त श्री.श्रीनिवास कुरे :** 7 वे वेतन आयोगा संदर्भात शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता. त्रुटींची पुर्तता करुन सादर केला आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :** राज्यातील मोठी महानगरपालिका आहे. कधी वेतन लागू होईल.

**उपायुक्त श्री.श्रीनिवास कुरे :** या बाबतीत पाठपुरावा सुरु आहे काही त्रुटी निघतात. आस्थापनाच्या खर्चाची त्रुट होती त्याची पुर्तता करुन दिली आहे. शासनाने उत्पन्न व होणा-या खर्चाची तजवीज कशी करणार याबाबत कळविले होते त्याची पुर्तता करुन अहवाल सादर केला आहे. शासन स्तरावर प्रस्ताव पाठवला आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :** आपण काम करुन घ्यायची अपेक्षा करतो. त्यांना वेतन लागू केले पाहीजे जी.आय.एस.चे 20 कोटीचे टेंडर निघणार आहे त्याची माहिती द्या.

**मा.सौ.शीला चव्हाण :** 7 वे वेतन आयोग लागू करा. शासनाची मंजूरी आज ना उद्या येईल. कर्मचा-यांच्या पगारात जमा करायला काय हरकत आहे.

**अतिरिक्त आयुक्त श्री.प्रदीप पठारे :** प्रशासन यासाठी पाठपुरावा करीत आहे. शासनाने सातवा वेतन 1 जानेवारी 2016 पासुन लागू केला. 110 कोटी अंदाजे फरका पोटी देणे आहे. त्यासाठी तरतुद करावी लागेल. शासन स्तरावर लागू करण्यासाठी पाठपुरावा चालू आहे.

**मा.सौ.शीला चव्हाण :** भविष्य निर्वाह निधीची थकबाकी किती आहे.

**मा.मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे :** 7.5 कोटी रुपये आहे.

**मा.सौ.शीला चव्हाण :** पगारातुन कपात केलेली रक्कम शिल्लक आहे का?

**मुख्यलेखाधिकारी श्री.शैलेश मोरे :** मागे वर्गच झाले नाहीत.

**अतिरिक्त आयुक्त श्री.पठारे :** सन 2016 साली महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती नसल्याने त्यातुन रक्कम वापरली. आणखी 7.5 कोटी जमा करणे बाकी आहे. टप्प्याटप्प्याने वर्ग करणार आहोत.

**मा.सौ.शीला चव्हाण :** ठेकेदाराचे देणे किती कसे देणार.

**मा.मुख्यलेखाधिकारी श्री.शैलेश मोरे :** 45 कोटी आहेत. निधी उपलब्धतेनुसार देणार.

**मा.सौ.शीला चव्हाण :** नगरसेवकांना दिल्या जाणा-या 5 लाख निधीतुन ते कोणी काम करीत नाही. नागरिकांच्या घरात पाणी जाते तेथे काम करणे आवश्यक आहे.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :** कॅश निधी करायला पाहीजे. निधी वाढवायला पाहिजे.

**मा.सौ.शीला चव्हाण :** अमृत योजना फेज-2 मुदत संपूण किती दिवस वर्ष झाले. आतापर्यंत किती रक्कम खर्च केली.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :** फेज-2 या संस्थेला आतापर्यंत तापी प्रिस्टेस ला 95 कोटी पार्वती 39.48 कोटी दिले या दोन्ही संस्थांकडून पाईल लाईन देण्याचे काम पूर्ण केले आहे.

अमृत - एकुण तीन पार्ट सिव्हील पार्ट 110.52 कोटी.

मॅकेनिकल - 11.6 कोटी खर्च,सोलर - 5.91 कोटी खर्च झालेला आहे.

**मा.सौ.शीला चव्हाण :** 800-900 कोटी रुपये प्राप्त झाले पण तसा विकास दिसत नाही. पेपरला येते 24 तास पाणी मिळणार.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** इतक्या दिवस या योजना रखडल्या याला अधिकारी जबाबदार आहेत. कित्येक वर्ष या गोष्टी पेंडींग आहेत. आयुक्त साहेब या गोष्टी लवकरात लवकर संपवा. टाईम लिमीट द्या अन्यथा अधिका-यांवर सभागृहात कारवाई करावी लागेल. अमृत योजना लवकरात लवकर उन्हाळा लागायच्या आधी चालू करा. येत्या 15 दिवसात हा विषय संपवा मिटींग घ्या.

**मा.सौ.शीला चव्हाण :** कोर्टाचा निकाल लागला व्हॅलिडीटी सर्टिफिकेटसाठी महानगरपालिकेने पत्र द्यावे.

**मा.आयुक्त श्री.पंकज जावळे :** ठीक आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :** 7 व्या वेतन आयोगाच्या प्रस्ताव त्रुटीसह परत महानगरपालिकेकडे आला. आपण त्या त्रुटी दूर केल्या का? आपण त्रुटी दुर करुन प्रस्ताव पुन्हा केंव्हा सादर करणार.

**मा.आयुक्त श्री.पंकज जावळे :** सोमवार किंवा मंगळवारी प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविण्यांत येईल.

**मा.श्री.अनिल शिंदे :** 7 व्या वेतन आयोगाचा वस्तुनिष्ठ अहवाल सादर करा या राज्याचे मुख्यमंत्री यांचेकडे 7 व्या वेतन आयोग लागू करण्याचा प्रयत्न करतो.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** 200 ते 400 कोटी नगरसाठी आणा.

**मा.श्री.अनिल शिंदे :** अमृत योजनेसाठी 850 कोटीचा 650 भुयारीचा प्रस्ताव सादर केला आहे. आपण सर्वजण प्रयत्न करु.प्राधान्याने पाण्याची योजना लवकरात लवकर मंजूर होईल यासाठी यादीत नाव नाही ते कसे टाकायचे हे आपण सर्वजण प्रयत्न करु. 175 पदे भरण्यासाठी शासनाने मंजूरी दिली ते कोणत्या स्तरावर आहे.

**अतिरिक्त आयुक्त श्री.प्रदीप पठारे :** कोणती भरती करण्यापुर्वी बिंदूनामावली पूर्ण करुन घ्यावी लागते ते विभागीय आयुक्त कार्यालयात तपासणीसाठी दिले आहे. लवकरच ती मान्यता मिळेल.

**मा.श्री.कुमार वाकळे :** मानधनातील कर्मचारी भरती माहिती द्या किती घेवू शकतो.

**अतिरिक्त आयुक्त श्री.प्रदीप पठारे :** मानधनावर कर्मचारी जेवढे पद मंजूर आहेत तेवढे घेवू शकतो. नियमानुसार त्यापेक्षा जास्त घेवू नये. आत्ता मानधनावर घेवू नये अशा शासनाच्या गाईड लाईन आहेत.

**मा.श्री.कुमार वाकळे :** मग पुर्वी भरलेले कॉन्ट्रॅक्ट वर शिफ्ट करा.

**अतिरिक्त आयुक्त श्री.प्रदीप पठारे :** जे सध्या मानधनावर 28 कार्यरत कर्मचारी आहेत त्यांनी महासभेकडे प्रस्ताव सादर करण्यासाठी पत्र दिले आहे. ते महासभेत सादर करतो. अभियंत्याच्या एक दोन दिवसात पाणीपुरवठया साठी ऑर्डर निघतील.

**मा.श्री.कुमार वाकळे :** बांधकाम इलेकट्रीकने काय केले.

**मा.श्री.अनिल शिंदे :** जे दोन बांधकाम विभागातुन सोडले ते तरी भरा.

**अतिरिक्त आयुक्त श्री.प्रदीप पठारे :** 175 पदात ते समाविष्ट आहेत.

**मा.श्री.अनिल शिंदे :** 750 कर्मचारी चतुर्थ श्रेणीतील आहेत. काही बिगारी म्हणुन ऑर्डर आहेत ते क्लार्क म्हणुन काम करीत आहेत. आपल्याला महानगरपालिकेला अधिकार आहेत.

**अतिरिक्त आयुक्त श्री.प्रदीप पठारे :** वर्ग 3 च्या कर्मचा-याला वर्ग 4 ची पदोन्नती देतो. जे पात्र आहेत त्यांना देतो. त्यासाठी पद रिक्त पाहीजे. सरळसेवेचे व पदोन्नतीचे असे दोन प्रकार आहेत.

**मा.श्री.अनिल शिंदे :** वारसा हक्क व 305 पैकी सर्व्हे केला का किती लोक अस्तित्वात आहेत. या लोकांना कधी समाविष्ठ करणार.

**आस्थापना प्रमुख श्री.साबळे :** त्यावेळेस जे वारस होते त्यांच्यापैकी ज्यांचे वय 45 वर्षापर्यंत आहेत त्यांना घेणार 45 वर्षापुढील त्यांनी न्यायालयाचे आदेश आणावेत. मा.उच्च न्यायालयाकडून स्पेसिफीक उल्लेख असावा. 45 वर्षे पुर्ण झाले नंतर त्यांचे वारसास घेणेत यावे. मला उल्लेख पत्र पाहीजे.

**मा.श्री.कुमार वाकळे :** कार्यवाही सुरु केली का.

**मा.श्री.अनिल शिंदे :** आउट सोर्सिंग कर्मचा-यांवर किती खर्च होतो.

**मा.श्री.कुमार वाकळे :** प्रस्ताव सादर करुन लवकरात लवकर पाठवुन द्या.

**अतिरिक्त आयुक्त श्री.प्रदीप पठारे :** 15 दिवसांत कार्यवाही करण्यांत येईल.

**मा.श्री.मनोज कोतकर :** आपले एक अधिकारी एक दोन महिन्यात रिटायर होतील. जाता जाता त्यांना बांधकाम विभागातील टेबल देण्यांत यावा.

**मा.श्री.गणेश कवडे :** आपली ती जुनी महानगरपालिका होती ती लक्ष्मी म्हणुन उल्लेख करतो. त्या कार्यालयाची दुरावस्था झाली आहे. ती मोडकळीस आली आहे. जुन्या महानगरपालिकेची लवकरात लवकर दुरुस्ती करावी. 25 वर्ष आमदार म्हणुन त्यांनी जनतेवर राज्य केले त्यांचे नांव त्या जुन्या महानगरपालिकेस देण्यांत यावे. मा.अनिल भैय्या राठोड

यांचा पुतळा उभारणेसाठी प्रस्ताव तयार करा.

**मा.श्री.शाम नळकांडे :** यास मी अनुमोदन देतो. वृत्तपत्राची बील अदा करणे बाबतचा विषय आहे.

**प्रसिध्दी अधिकारी श्री.नजान :** हिंदी इंग्रजी दैनिकाची बिल देण्यात यावीत परंतु बीले ही काढण्याचा प्रयत्न केला लेखापरिक्षणात त्रुटी काढली शासकीय दराने जाहीरातीचे सर्व बील अगोदर एक वर्षा पुर्वीची असल्याने महासभेपुढे मांडावे लागणार व या वर्षात जर खतविले नाही तर पुढच्या वर्षी निधी तरतुद करावी लागेल.

**मा.श्री.शाम नळकांडे :** चालू वर्षात तरतुद करुन बील देवून टाका.

**उपायुक्त श्री.यशवंत डांगे :** द्यायला विरोध नाही टप्प्या टप्प्याने देवू.

**मा.महापौर मॅडम :** इंग्रजी व मराठी दैनिकांची बिले अदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.

**सभापती स्थायी समिती श्री.गणेश कवडे :** इंग्रजी व मराठी दैनिकांची बिले अदा करणेस मी अनुमोदन देतो.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :** सावेडी स्मशान भुमीचा काय विषय आहे. शेतकरी जागा देत नाहीत. वडगांव पंपिंग स्टेशन जवळ महानगरपालिकेची जागा आहे.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** सावेडी 58.59 आरक्षण स्मशानभुमीसाठी आहे. भूसंपादन करावे लागेल.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :** महानगरपालिकेची जागा आहे तेथे का करीत नाही.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** विकास योजनेता कोणते झोन जोडले आहेत ते पहावे लागेल. सुधारीत विकास योजनेत सोय करता येईल. आयुक्त साहेबांसमोर प्रस्ताव ठेवावा लागेल.

**मा.श्री.योगीराज गाडे :** जागा भेटली तरी या बजेटमध्ये झीरो तरतुद आहे.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :** कचरा डेपोवर करा. पालिकेमध्ये ठराव झालेला आहे.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** शासनाकडे प्रस्ताव सादर करावा लागेल. कचरा डेपोवर तात्पुरत्या स्वरुपात तरतुद केली आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :** पर्पज चेंज करण्यासाठी प्रस्ताव सादर करा.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** ठराव करुन शासनाकडे पाठवावे लागेल. पुर्वीचा ठराव तात्पुरत्या वापरा बाबतचा होता. कलम 35 नुसार कार्यवाही करावी लागते. ठराव 37 खाली मंजूर झालेला नाही. तो करावा लागेल. त्यानंतर पुढची कार्यवाही करावी लागेल.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** उद्या बुरुडगांव म्हणणार इथे कचरा टाकू नका. सावेडीत टाकू नका, मग कचरा कोठे टाकणार. एका ठिकाणी कचरा डेपो किती दिवस ठेवणार.

**मा.श्री.संपत बारस्कर :** चार झोनला चार ठीकाणी कचरा डेपो ठेवा. या विषयासाठी स्वतंत्र मिटींग लावा.

**मा.श्री.कुमार वाकळे :** बोल्हेगांव मधे कोठे स्मशान भुमी करता येईल रस्त्याच्या साईड पट्टीला अंत्यविधी कराबा लागतो.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** दोन आरक्षण आहेत. कंम्पलसरी अॅक्वीझीशन करु शकतो.

**मा.श्री.कुमार वाकळे :** नविन डीपीत तरी करा.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** जागेचा रेट व्हॅल्युएशन असेल ते द्यावे लागेल.

**मा.श्री.कुमार वाकळे :** हॉस्पीटलला पण अशीच परवानगी दिली का? एफ.एस. आय वापरुन दिले का? हॉस्पीटलला परवानगी कोण देत. धर्मार्थ हॉस्पीटलची यादी द्या.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** एफएसआय. नगररचनाकार विभाग देतो. पुढची प्रोसेस आरोग्य अधिकारी मार्फत देतो. धर्मादाय हॉस्पीटलची माहिती माझेकडे नाही.

**मा.श्री.कुमार वाकळे :** 10% मोफत बेड ठेवले का?

**आरोग्याधिकारी श्री.बोरगे :** हॉस्पीटलला चॅरीटी कमिशनला अर्ज करावा लागतो.

**मा.श्री.कुमार वाकळे :** 10 टक्के बेड आहेत का नाही. बॉम्बे नर्सिंग होम अॅक्ट खाली परवानग्या दिल्या त्यात धर्मादाय हॉस्पीटल आहेत का.

**आरोग्याधिकारी श्री.बोरगे :** जेवढया बेडची मागणी करतात त्याप्रमाणे महानगरपालिका रक्कम भरुन घेतो. चॅरीटी अॅक्ट खाली रजिस्ट्रेशन साठी चॅरिटी कमिशनची मंजुरी घ्यावी लागते. यादी आपल्याकडे नसते. परवानगी स्वतंत्र असते.

**मा.श्री.कुमार वाकळे :** रिन्युएशन किती वर्षांनी करतो.

**आरोग्याधिकारी श्री.बोरगे :** तीन वर्षांनी.

**मा.श्री.कुमार वाकळे :** त्यावेळी तुम्हाला कळते की, हॉस्पीटल चॅरीटी अॅक्ट खाली येते का.

**आरोग्याधिकारी श्री.बोरगे :** या संदर्भात माहिती नाही उद्या माहिती घेवून सांगतो. एक तासात मागवुन घेतो. माझे माहिती नुसार आनंदऋषीजी, नोबेल हॉस्पीटल आहेत.

**मा.श्री.कुमार वाकळे :** किती बेडची संख्या.

**आरोग्याधिकारी श्री.बोरगे :** 7 हजार बेड आहेत.

**मा.श्री.कुमार वाकळे :** बीपीएल खाली किती बेड शिल्लक आहेत. हॉस्पीटलला स्वतःला बेड ठेवावे लागतात.

**आरोग्याधिकारी श्री.बोरगे :** दोनच योजना आहेत.

**मा.श्री.कुमार वाकळे :** अॅडमिट साठी बेड राखीव ठेवावे लागतात हे माहित आहे का.

**आरोग्याधिकारी श्री.बोरगे :** माहित नाही.

**मा.श्री.कुमार वाकळे :** बायोमेडीकल वेस्ट उचलले जाते का.

**आरोग्याधिकारी श्री.बोरगे :** बायोक्लीन सिस्टीम इंडिया या संस्थेला काम दिले आहे. बुरुडगांव कचरा डेपो येथे 5 वर्षासाठी प्रकल्प दिला. कचरा संस्थेकडून घ्यायचा व त्याची विल्हेवाट लावायची. एमडीसीचे अधिकारी सदस्य सचिव आहेत. विमा संघटनेचे सदस्य आहेत. ते रेट फिक्स करतात. 5.75 प्रति कॉट रेट दिला. सिव्हील हॉस्पीटल 5.75 जमा करतात आता साधारणतः अंदाजे 20% रॉयल्टी (5 लाख) महानगरपालिकेला मिळतात.

**मा.श्री.कुमार वाकळे :** स्थायी समितीत या विषयावर चर्चा झाली ती चर्चा वाचन केली.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :** अधिकारी अशी मोघम उत्तरे देतात.

**उपायुक्त श्री.डांगे :** बॉम्बे नर्सिंग अॅक्ट हॉस्पीटला परवानगी ते देतात. त्या देण्यापूर्वी नगररचनाकार यांचेकडून तपासून घेतलेच पाहीजे. फायर एनओसी घेणे आवश्यक आहे. स्वतःच्या लेव्हलवर परवानग्या दिल्या जातात त्यामुळे हे प्रश्न निर्माण होतात. दिल्लीगेट येथील थोरात हॉस्पीटलला यांनी परवानगी दिली. सीएम कार्यालया पर्यंत तक्रारी गेल्या. नर्सिंग होम अॅक्ट खाली गेल्या वर्ष भरातील परवानग्या दिल्या यापुढे परवानग्या या ऑनलाईन पध्दतीने दिल्या पाहीजेत. व त्याची माहिती सर्वांना दिली पाहीजे.

**मा.श्री.कुमार वाकळे :** तुम्ही खोटे का बोलले. स्थायी समिती चर्चेत सर्व माहिती तुम्ही दिली. बायोवेस्ट मटेरियल बरेचसे लोक बाहेर विकतात.

**आरोग्याधिकारी श्री.बोरगे :** सर्व संस्थांनी ठेकेदाराला दिले पाहीजे. हॉस्पीटलने ते द्यायलाच पाहीजे.

**मा.श्री.मदन आढाव :** बोल्हेगांव येथील रोड खोदला फेज-2 ची लाईन जोडायची ;;;;;;;;;; 8 लाईन हेड करुन नविन लाईनला जोडायच्या.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :** बोल्हेगांव येथे रस्त्याचे काम चालू आहे. साईटवर काम चालू झाले आहे. जिथपर्यंत रोड आहे तिथपर्यंत लाईन टाकणार.

**मा.श्री.मदन आढाव :** पोलीस कॉलनीची सेपरेट लाईन आहे ती रिपुटींग करावी लागेल.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :** नव्याने लाईन टाकावी लागेल. फेज-2 चा ठेकेदार वेगळा आहे. नविन एस्टीमेट करावे लागेल.

**मा.श्री.शाम नळकांडे :** मुळा डॅमचे  एक कोटीचे वीज बील अदा केले त्याठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प उभारु शकतो. पवनचक्की छोटे वीज निर्मीती प्रकल्प होउ शकतो.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :** जागा जेवढी पाहिजे तेवढी उपलब्ध नाही.

**मा.श्री.शाम नळकांडे :** नवनियुक्त मा.सभापती स्थायी समिती व मा.विरोधी पक्ष नेता यांचा या ठिकाणी सत्कार करु. अंतर्गत निधी जे पैसे भरले ते पावत्या करायचे थांबले आहे.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** ले आउट  मधले जे काम करतात ते थर्ड् क्लास करतात आपल्याकडे पैसे भरुन घ्या.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** आपल्याकडे मंजूरी देतांना बांधकाम पाणीपुरवठा इलेक्ट्रीक विभागाची N.O.C. असल्याशिवाय मंजूरी देत नाही.

**मा.श्री.मनोज कोतकर :** दौंड रस्त्याचे काम पुर्ण झाले त्या ठिकाणी लाईट बसवावेत बील पालिका भरेल. फक्त आश्वासन दिले जाते. पालिका बील भरणार असेल तर ते सांगा अनेक अॅक्सीडेंट होतात. आपल्या हद्दीत लाईट असतांना लाईट का लागत नाही.

**मुख्यलेखाधिकारी श्री.शैलेश मोरे :** अंतर्गत सुधारणा ऑफ लाईन पैसे बाय फरगेशन करता येतात. ऑनलाईनचे एकच अकौंट आहे. लेखापरीक्षण झाल्यानंतर दुरुस्ती करावी लागते.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** वाकळे साहेब महापौर असतांना केले होते. ऑनलाईन पावत्यांचे सेपरेशन करावे लागेल. 2020 पर्यंत झाले आहे. या 8 ते 10 दिवसात पुर्ण होईल.

**मा.श्री.शाम नळकांडे :** ऑनलाईन मध्ये पैसे जमा होवून आपल्याला काम करता येत नाही. तुम्ही कर्मचा-यांकडुन काम करुन घ्यायला पाहीजे होते. मुदतीत केले नाहीतर कलम 56 (अ) खाली निलंबनाची कारवाई करावी.

**मा.महापौर मॅडम :** लवकर करुन घ्या.

**इलेक्ट्रीक विभाग प्रमुख जोशी वैभव :** दौंड रोडचा रस्ता कायनेटीक चौक एमएसआरडीसी ने रस्ता केला आहे. रस्ता करतांना तत्कालीन उपायुक्त यांचे मंजूरीने दिवे लावले. महानगरपालिका बील देयक अदा करिल असे कळविले. लोड जास्त होतो. त्या करीता अजुन मिटर बसवावे असे कळविले. उड्डाणपुलालाही विद्युत पुरवठयाची व्यवस्था केली दोनही बीले भरण्याचे प्रस्ताव आले आहेत. महानगरपालिका कायद्यातील तरतुदीनुसार त्यांचे कॉन्टॅक्ट मध्ये वीज बील महानगरपालिका भरेल अशी कुठलिही तरतुद नाही.

**मा.श्री.मनोज कोतकर :** 15 दिवसात लाईट चालू झाल्या पाहीजे अन्यथा आम्ही तुमच्या दालनात आंदोलन करु.

**इलेक्ट्रीक विभाग प्रमुख जोशी वैभव :** आपण सदरचा प्रस्ताव महासभे समोर ठेवत आहोत. प्रोसेस मध्ये आहे.

**मा.श्री.मनोज कोतकर :** तिथ जर काही दुर्घटना घडली तर महानगरपालिकेची सर्वस्वी जबाबदारी राहील नसेल परवडणार तर पथदिवे काढुन टाका.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** घ्या दुसर मीटर सभागृहाची मंजूर समजुन महापौर मॅडमचे रुलिंग घेवून मंजूर करुन टाका.

**इलेक्ट्रीक विभाग प्रमुख जोशी वैभव :** पूर्ण शहरासाठी 60 वॅटचे दिवे लावले त्यांनी 180 वॅटचे लावले आहेत.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** एका मीटरवर जेवढे लागतील तेवढे लगेच लावा. दुसरे नविन मीटर लावल्यावर बसवा.

**मा.श्री.मनोज कोतकर :** परवा वाडियापार्क मध्ये क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले त्याबद्दल मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त व सर्व सदस्यांचे मनापासुन आभार मानतो. आताच सांगीतले 2.5 लाख रुपये या स्पर्धांवर खर्च झाले खर्चाचा तसा ठराव करावा व दरवर्षी अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे व बजेटमध्ये तरतुद करावी.

**मा.महापौर मॅडम :** दरवर्षी या स्पर्धा आयोजित कराव्यात.

**मा.श्री.मनोज कोतकर :** अहमदनगर महानगरपालिका हद्दीत जिल्हा परिषदेच्या अनेक शाळा आहेत. ब-याच शाळा मोडकळीस आल्या आहेत. मी जिल्हा परिषदेच्या सभेत हा प्रश्न मांडला त्याचे म्हणणे या शाळा महानगरपालिका हद्दीत आहेत. एक दिवस सर्वांनी भेट द्या. भिंती पूर्ण पणे चिरल्या आहेत. शाळेत कधी दुर्घटना घडून याचे खापर महानगरपालिकेवर फुटेल. महापौर, उपमहापौर यांचे माध्यमातुन इंदिरानगरचा प्रश्न मार्गी लागेल. एखाद्या अधिका-याची त्या ठिकाणी नियुक्ती करावी. या शाळा दलितेतर व्यतिरिक्त असेल तर त्यासाठी जिल्हा परिषदे मार्फत निधी उपलब्ध करावा लागेल. फक्त खोल्या बांधावयाच्या आहेत.

**मा.आयुक्त श्री.पंकज जावळे साहेब :** चारठाणकर जागेची मालकी तपासुन घ्या मला उद्या दाखवा. अतिरिक्त आयुक्त याचा पाठपुरवा करतील.

**मा.श्री.कुमार वाकळे :** रस्ते खोदाई फी कोणाकडे आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :** आठरे पाटील ते महालापर्यंत रोड वायडींग करतांना पोल काढले ते पुन्हा बसविले. आता त्यावर दिवे बसवा.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** ठेकेदाराला आपण काम देतो. फक्त काम घेवून पडून द्यायचे सभागृहाचे वतीने मागणी करतो की, अशा ठेकेदाराची यादी करुन त्यांचेवर कारवाई करावी.

**इंजिनियर श्री.पारखी :** ठेकेदारांची यादी तयार करु. पुढच्या महासभेत कारवाई करुन सादर करु.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :** पारखींना चेंबरचे झाकणे लावायला फोन केले. प्रत्येक वेळेस ते करतो म्हणतात. आम्हाला काम धंदे नाहीत का. प्रत्येक वेळेस थातुर मातुर उत्तरे देतात. एका नागरिकाच्या घरी लग्न होते ते काकुळतीला आले होते.

**इंजिनियर श्री.पारखी :** मी त्यातले काही चेंबर दुरुस्ती केले पेमेंट न दिल्याने त्या ठेकेदाराने काम थांबवले होते. 15-20 दिवसापुर्वी बिल मंजूर झाले आहे. महानगरपालिका फंडातुन खर्च करतो. कॅश पेमेंट नसल्याने ठेकेदार काम करीत नाही. उद्या परवा दिवशी येवून ते करुन देतील.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :** घनकच-याची नियमावली वाचून दाखववी.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :** शिंदे मळयातील ओपन स्पेसचा निधी परत जाण्याची वेळ आली तो मोजुन□क्रा दिला नाही.

पान नंबर 39 चे तरतुदींचे वाचन

अग्निशमन विभाग : पान नंबर 40, 41, 44

**मा.श्री.कुमार वाकळे :** रस्ते खोदाई फी किती रुपये मिटरने धरली.

**अकौंट विभाग श्री.लोंढे :** 35 कोटी पान नंबर 11 वर

**इंजिनियर श्री.पारखी :** दोन हजार रुपये प्रति रनिंग मिटर चे पैसे भरुन घेतले हा रेट महासभेने ठरवीला आहे. आता प्रशासनाने 10 हजार ठरविला. स्थायी समितीने 15 हजार प्रस्तावित केला आहे. आपण तसे कंपनीला कळविले आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :** कंपनीला कळवायचे कारण काय?

**इंजिनियर श्री.पारखी :** आपण त्यांना डिमांड नोट दिली. आपल्याकडे त्यांनी मागणी केली. डिमांड नोट 10 हजार रुपये दराने दिली. स्थायी समितीला 10 रुपयांप्रमाणे तरतुद सुचविली त्याप्रमाणे दिली.

**मा.श्री.कुमार वाकळे :** पैसे कमी का दिले कोणाला अधिकार आहे. रक्कम कमी करायचा. ठेकेदार कोर्टात गेला का. राज्य सरकारने निर्देश दिले का? केंद्र सरकारने निर्देश दिले का? म्हणुन तुम्ही रक्कम कमी करुन कळविले.

**इंजिनियर श्री.पारखी :** कलेक्टर साहेबांकडे मिटींग झाली. त्या बैठकिचे ईतिवृत्तानुसार कळविले.

**मा.श्री.कुमार वाकळे :** कलेक्टर साहेब कसे सांगतील. ती कंपनी कलेक्टर साहेबांकडे कशी गेली. मग त्यांनीच परवानगी द्यावी. रस्ते फोडायचे.

**उपायुक्त श्री.डांगे :** केंद्र शासनाच्या प्रतिनिधींनी थेट सीएम कार्यालयात संपर्क साधला. त्यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे बैठक आयोजित केली होती.

**मा.श्री.कुमार वाकळे :** तुम्ही आदेश दाखवा. मुख्यमंत्री साहेबांचा आदेश असेल तर मान्य करा. आपल्याच लोकांना कमी करायचे जर राज्य सरकारचा, केंद्र सरकारचा आदेश आला तर पाहू. वेगवेगळया शहरात वेगवेगळे दर आहे. नगरविकास विभागाने आदेश करावेत आम्ही मान्य करु.

**मा.श्री.अनिल शिंदे :** स्थानिक स्वराज्य संस्थेचे नुकसान होता कामा नये. आपले रस्ते ते खराब करणार व आपले दरही मान्य नाही म्हणतात हे कसे चालेल.

**मा.आयुक्त श्री.पंकज जावळे :** डीएसआर  सीएसआर रेट जे असतात तेच रेट रस्ते खोदाईसाठी असतात.

**मा.श्री.अनिल शिंदे :** आपला डीएसआर रेट पीडब्ल्युडी प्रमाणे करतो. त्यांचे पत्र आहे का. याप्रमाणे डीएसआर रेट आहेत.

**मा.श्री.कुमार वाकळे :** ते एकदाच पैसे भरणार आहेत. रेल्वेच्या जागेतुन आपली लाईन गेली तर आपल्याला पैसे भरावे लागतात.

**मा.श्री.अनिल शिंदे :** किती किलो मीटरला परवानगी देणार आहोत. महासभेची मंजूरी घेतली का.

**इंजिनियर श्री.पारखी :** 150 किलो मीटर परवानगी घ्यायची.

**मा.श्री.कुमार वाकळे :** 15 हजारांनी रेट घ्या. राज्यसरकारचा आदेश घ्या. करुन घ्या.

**मा.श्री.गणेश कवडे :** या विषयासाठी सेपरेट मिटींग लावू.

**उपायुक्त श्री.यशवंत डांगे :** जिल्हाधिकारी यांचेकडील बैठकीचे इतिवृत्त वाचन केले.

**मा.श्री.कुमार वाकळे :** माझे म्हणणे गॅस कंपनीचेच नाही. कोणीही त्या रेटने करावे. मी सभापती असतांना दर मंजुर केले. जर अधिकार कलेक्टर वापरत असतील तर बजेट कलेक्टरकडे पाठवावे. मशिनने बोअरने ड्रील करायचे रस्ते खराब करायचे  त्यांना आमच्या हद्दीतुन जायचे. कायदेशीर लढण्यासाठी मी वकील देतो. 15 हजाराने करावे. ज्या भागात पैसे भरले त्या भागात 75% कामे करा. उर्वरीत 25% दुसरी कडे करा.

**मा.श्री.संपत बारस्कर :** जिथे रस्ते खोदनार त्या भागात निधीतुन रक्कम खर्च करावी इतर ठिकाणी वापरु नये.15 हजार रुपये आकारावे या मताला मी अनुमोदन देत आहे. कंपनीला जर वाटले नाही तर थोडे फेक्झीबल रहावे.

**मा.श्री.कुमार वाकळे :** टॅक्स कमी जास्त त्याच वेळेस होते आत्ताच्या सभेत होत नाही. 19 फेब्रुवारीच्या नंतर महत्व रहात नाही. कलेक्टर साहेबांनी डीपीडीसी साठी निधी वाढवुन द्यावा. जिल्हा परीषद निधी देते. महानगरपालिकेला किती निधी मिळतो. स्थायी समितीत मंजुर दर असताना कमी दराने मंजुरीचा निर्णय घेतलात महानगरपालिकेच्या आर्थिक हिताविरुध्द निर्णय घेतला यावर मी न्यायालयात जाईन.

**मा. श्री. संपत बारस्कर:** आता त्या एएसी भरुन घ्यायचा तो घ्या. नंतर जे येतील त्यांचेकडून 15 हजार ने करा. असे ज्यांना वाटते 15 हजार व्हावे त्यांनी हात वर करावेत.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** महापौर, उपमहापौर सभापती स्थायी समिती घ्या. कुमार वाकळे, संपत बारस्कर यांनी बैठक घ्या. चार जणांची कमिटी करा.

**मा.श्री.गणेश कवडे :** चार जणांची कमिटी नेमा असा ठराव करा. बजेट मंजूर करुन टाका.

**उपायुक्त श्री.यशवंत डांगे :** घनकचरा व्यवस्थापन विभाग कचरा संकलन टेंडर मधील अटी व शर्ती वाचन केले व माहिती दिली. अटीनुसार कचरा संकलन दररोज करावे लागेल. जर वाहन रोज जात नसेल तर त्याला वारंवार तपासणी करुन नोटीस द्यावी लागेल.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :** व्यवस्थीत काम नसेल तर दंड करा. नोटीस द्या.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :** अटी शर्ती सर्व नगरसेवकांना द्या.

**मा.श्री.मनोज कोतकर :** केडगांव पाणी योजना ठेकेदाराचे 20-20 लाखाचे बील राहीले आहे. त्याचे पैसे द्यावेत.

**मा.महापौर मॅडम यांचे मनोगत**

**नमस्कार**

अहमदनगर शहराचे ग्राम दैवत श्री विशाल गणपती व महाराष्ट्राचे कुलस्वामिनी आई तुळजाभवानी, सातारा येथील मांढरादेवी, संत ज्ञानेश्वर महाराज, जगतगुरू संत तुकाराम महाराज व राष्ट्रसंत आनंदऋषीजी म.सा. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे प्रेरणेने तसेच हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या आर्शिवादाने, माजी मंत्री स्व.अनिल भैय्या राठोड यांचे विचाराने शहराच्या विकासासाठी व नागरिकांना नागरी सुविधा देण्यासाठी पंतप्रधान मा.ना.श्री.नरेंद्रजी मोदी साहेब, मा.श्री.उध्दवजी ठाकरे साहेब, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.श्री.एकनाथजी शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब, विरोधीपक्ष नेता मा.ना.श्री.अजितदादा पवार साहेब, माजी केंद्रीय मंत्री मा.श्री.शरदचंद्रजी पवार साहेब, अहमदनगर जिल्हा पालकमंत्री मा.ना.श्री.राधाकृष्णजी विखे पाटील साहेब, संपर्क प्रमुख मा.आ.श्री.सुनिलजी शिंदे साहेब, मा.खा.डॉ.श्री. सुजयजी विखे पा.साहेब, माजी आ.श्री.अरूणकाका जगताप साहेब, मा.आ.श्री.संग्रामभैय्या जगताप साहेब, आयुक्त मा.डॉ.पंकज जावळे , अतिरिक्त आयुक्त मा.डॉ.प्रदिप पठारे, सर्व उपायुक्त मनपाचे कामकाज करताना उपमहापौर मा.श्री.गणेश भोसले, स्थायी समिती सभापती मा.श्री.गणेश कवडे, सभागृह नेते मा.श्री.विनीत पाऊलबुधे, विरोधी पक्ष नेते मा.श्री.संपत बारस्कर, महिला व बाल कल्याण समिती सभापती मा.सौ.पुष्पाताई बोरुडे, उपसभापती मा.सौ.मीनाताई चोपडा, सर्व नगरसेवक नगरसेविका आपले मार्गदर्शन व सहकार्य तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे कामकाज करताना सर्वतोपरी सहकार्य मला मिळत आहे. महापौर पदाचा पदभार घेतल्यापासून महानगरपालिकेच्या माध्यमातून नागरिकांना चांगल्या नागरी सुविधा देण्याचा प्रयत्न करित आहे. मी अहमदनगर महानगरपालिकेचे सन 2023-2024 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक घेवून आपणा समोर येत आहे.

या आर्थिक वर्षामध्ये नागरिकांना नागरी सुविधा देताना शहर व उपनगराच्या विकासाच्या दृष्टीने व आपणा सर्वाच्या सहकार्याने शहराचा विकास करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. मनपाचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्यासाठी, मनपाचा इतर खर्च कमी होण्याच्या दृष्टिने प्रयत्न करण्यात येणार आहे.

- अमृत पाणी पुरवठा योजना विषयक कामातील पाईप लाईन टाकण्याचे काम पूर्ण झालेले असून सब स्टेशनचे काम देखील पूर्ण झालेले आहे. इलेक्ट्रीक मोटार बसविणेचे काम सुरू आहे. यामुळे वसंत टेकडी येथे पाण्याची आवक वाढून लवकरच शहरामध्ये मुबलक पाणी पुरवठा करण्यात येईल.
- कल्याण रोड परिसरातील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर असून येत्या काळात पिण्याचे पाणी या परिसरात मुबलक प्रमाणात मिळावे या दृष्टिने प्रशासनास आदेश देण्यात आलेले आहे. त्यानुसार कार्यवाही सुरू आहे.
- अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-2 योजनेतील पाईप लाईन वितरणाचे काम झालेले असून त्या पाईप लाईन द्वारे पाणी पुरवठा वितरणाबाबत कार्यवाही करण्यात येईल.
- उपनगरासाठी आवश्यक असणारी अमृत योजने अंतर्गत शहरी भुयारी गटर योजना टप्पा 2 मा.शासनाकडे मंजूरी साठी प्रस्ताव सादर केले आहे. या आर्थिक वर्षात या योजनेस मंजूरी मिळाल्यास उपनगरातील ड्रेनेज लाईनचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होणार आहे.
- शहरातील भावी पिढीस महापुरूषांचा आदर्श निर्माण व्हावा याकरिता अहमदनगर महानगरपालिका परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणेचे काम सुरू आहे. तसेच सावेडी येथील प्रोफेसर कॉलनी चौक येथे छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा तसेच मार्केट यार्ड चौक येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणे, माळीवाडा वेस येथे महात्मा ज्योतिबा फुले यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणे या कामासाठी मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आला असून लवकरच महापुरूषांचे पुतळे बसविण्यात येतील.
- महिलांसाठी विविध योजना / सांस्कृतिक कार्यक्रम / प्रशिक्षण / शिबीरे आयोजित करुन महिलांना सक्षम करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहित करणार आहे.
- शहर स्वच्छ सर्व्हेक्षण व माझी वसुंधरा योजने अंतर्गत शहरामध्ये मोठयाप्रमाणात वृक्ष लागवड, उदयान विकसीत करणे तसेच पर्यावरणाच्या दृष्टिने विविध विकास कामे करण्यात येणार आहे. यामुळे शहराचा चेहरा मोहरा बदलण्यास मदत होणार आहे.
- अहमदनगर महानगरपालिकेस शहर स्वच्छते मध्ये थ्री स्टार मानांकन मिळालेले आहे. पुढील कालावधीत फाईव्ह स्टार मानांकन मिळावयाचे आहे याकरिता सर्व पदाधिकारी, नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी व कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य अपेक्षित आहे.
- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याची इमारत जूनी झाली असून या ठिकाणी गोर गरिब रूग्णांच्या दृष्टिने विचार करून नविन अद्यावत सुविधेसह नविन इमारत बांधण्यासाठी मा.शासनाकडे निधीची मागणी करण्यात येवून त्या माध्यमातून इमारत बांधण्यात येईल.
- मा.शासनाकडून मोठया प्रमाणात निधी महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे. यानिधीतून शहर व उपनगरातील विकास कामे प्रस्तावित करण्यात आलेली असून येत्या एक ते दोन महिन्यामध्ये सदरची कामे पूर्ण होवून शहर सौदर्यात भर पडणार आहे.
- नाटयगृहाचे काम प्रगती पथावर आहे. या आर्थिक वर्षात नाट्यगृहाचे काम लवकरात लवकर पूर्ण करुन नाट्य रसिकांसाठी नाट्यगृह खुला करण्याचा प्रयत्न करणार आहे.

- शहर व उपनगरातील प्रमुख रस्त्यांची कामे हाती घेण्यात आलेली आहेत. याच पध्दतीने आणखी प्रमुख रस्ते या आर्थिक वर्षात प्रस्तावित करण्याचा प्रयत्न करणार आहे.
- शहर सौदर्यात भर पडण्यासाठी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील छोटे मोठे चौक सुशोभिकरण, रस्त्याच्या मधोमध डिव्हायडर टाकून सुशोभित करण्यात येईल.
- चितळे रोड येथील नेहरू मार्केटच्या जागी शॉपिंग कॉम्प्लेक्स व सावेडी शॉपिंग कॉम्प्लेक्स मनपाच्या माध्यमातून बांधण्यात येणार आहे. यादृष्टिने प्रशासनास कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.
- मनपाच्या पिंपळगांव माळवी येथील जागेत मनपाचे उत्पन्नाचे वाढविण्याच्या दृष्टिने मोठा प्रकल्प आणण्यासाठी कार्यवाही सुरू आहे. सदर प्रकल्पामुळे मनपाच्या उत्पन्नात वाढ होईल.
- पिंपळगाव माळवी येथील तलावामध्ये बोटिंग सुरु करुन मनपाच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल.
- मनपाच्या जागेत व्यवसायिक इमारत बांधणे , गाळे बांधून भाडे तत्वावर देवून मनपाच्या उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टिने प्रयत्न करणार आहे.

सन 2023- 2024 चे अंदाजपत्रक मा.स्थायी समितीने तयार करून मा.महासभेपुढे सादर केले आहे. महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता शहर व उपनगराच्या विकासासाठी मा.शासनाकडे मोठया प्रमाणात निधीची मागणी करण्यात आलेली आहे. मा.शासनाकडून निश्चितपणे निधी उपलब्ध होणार आहे. यामाध्यमातून शहर व उपनगरात मोठया प्रमाणात विकासाची कामे होणार आहेत.

या सर्वाचा विचार करून या शहराचे नागरिक निश्चितपणे मनपास सहकार्य करतील अशी अपेक्षा आहे. तसेच आपल्या सर्वाचे मार्गदर्शन व सहकार्य याची अपेक्षा करित असून ते आपणा सर्वाकडून निश्चित मिळेल या अपेक्षेसह उपस्थित पदाधिकारी, नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी व पत्रकार बंधू व इलेक्ट्रॉनिक मिडीया यांचे प्रतिनिधी यांनी माझे मनोगत शांतपणे ऐकून घेतले त्याबद्दल अभार.

जय हिंद जय महाराष्ट्र

सही/- रोहिणी संजय शेंडगे
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

--*--

**<u>ठराव</u>** -

सन 2022-2023 चे जमा व खर्च बाजूमध्ये सुधारित व सन 2023-2024 चे अंदाजपत्रकाबाबत मा.स्थायी समितीने केलेल्या सुचना, दुरूस्त्या व फेरफार व शिफारशीसह तसेच मा.महासभेमध्ये मा.सदस्यांनी केलेल्या सुचना व दिलेले पत्र तसेच दुरूस्त्या फेरफार यासह अंदाजपत्रकास ही सभा मान्यता देत आहे.

- छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा, महात्मा ज्योतिबा फुले याचा पुर्णाकृती पुतळा, छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा बसविणे बाबत लवकरात लवकर कार्यवाही होण्याच्या दृष्टिने प्रशासनाने कार्यवाही करावी.

- मनपा हद्दीतील अनाधिकृत नळ कनेक्शनची शोध मोहिम राबवून अनाधिकृत नळ कनेक्शन नियमीत करणेत यावे यामुळे मनपाच्या उत्पन्नात भर पडेल.
- मागील आर्थिक वर्षातील नोंव्हेबर 2022 नंतर सुरू होणारा मनपा निधीतील काही कामे मार्च महिन्यामध्ये मंजूर झाले. त्यामुळे विकास कामांचे देयके 31 मार्च पूर्वी अर्थ विभागात बांधकाम विभागा अंतर्गत जमा करता आले नाही. मागील आर्थिक वर्षातील या प्रस्तावित करण्यात आलेल्या विकास कामांना चालू आर्थिक वर्षात लेखाशिर्ष निहाय तरतूद समाविष्ट करणे आवश्यक आहे. **रेखांकन अंतर्गत सुधारणा ( बांधकाम )** 38.00 लाख , **विकासभार** निधीतून खर्च 2,09,50,000/- , **अतिरिक्त चटई निर्देशांक पोटी प्रिमीयम** रकमेतून कामे करणे 7.93 कोटी , **रेखांकन अंतर्गत सुधारणा (लेआऊट )** 1.71 कोटी , **आमदार निधी** रक्कम रू. 8.11 कोटी, **खासदार निधी** रक्कम रू. 35.00 **लाख रस्ते दुरूस्ती** 49.00 लाख , **रस्ते खोदाई फी मधून रस्ते करणे / दुरूस्ती** रक्कम रू. 3.50 कोटी, **नविन रस्ते विकसीत** करणे रक्कम रू. 2.55 कोटी, सदरील निधी या लेखाशिर्षातील प्रस्तावित विकास कामांसाठी वापरण्यात यावे. अशा कामांच्या निधीसह चालू आर्थिक वर्षात सदर लेखाशिर्षामध्ये तरतूद करण्यात यावी यास ही सभा मान्यता देत आहे. मागील आर्थिक वर्षातील विकास कामांचे प्रस्ताव प्राधान्याने घेण्यात यावे.
- अर्थ विभागाकडून 31 मार्च 2023 पूर्वी देयके अदा न झाल्याने त्या देयकांसाठी रेखांकन अंतर्गत सुधारणा (लेआऊट ) या लेखाशिर्षात 72.00 लाख ची तरतूद करण्यात यावी. रस्ते खोदाई फी मधून रस्ते करणे / दुरूस्ती या लेखाशिर्षात रक्कम रू.1.22 कोटी तरतूद करण्यात यावी.
- मा.सदस्य यांनी मा.महासभेत केलेल्या चर्चे नुसार चालू आर्थिक वर्ष सन 2023-2024 करिता विकासभार या लेखाशिर्षात रक्कम रूपये 1.53 कोटी ने तरतूद वाढ करून रक्कम रू. 3.90 कोटी तरतूद करण्यात यावी. अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे या लेखाशिर्षात 3 कोटी ने तरतूद वाढ वाढ करून रक्कम रू. 15.00 कोटी तरतूद करण्यात यावी. रेखांकन अंतर्गत सुधारणा (लेआऊट ) या लेखाशिर्षात 50 लाखाने तरतूद वाढ करून रक्कम रू. 3.00 कोटी तरतूद करण्यात यावी. रेखांकन अंतर्गत सुधारणा (बांधकाम ) या लेखाशिर्षात 25 लाखाने तरतूद वाढ करून रक्कम रू. 75.00 लाख तरतूद करण्यात यावी.

वरिल प्रमाणे लेखाशिर्ष निहाय मागील आर्थिक वर्ष व चालू आर्थिक वर्षासाठी तरतूद करण्यात आलेली असून **रेखांकन अंतर्गत सुधारणा ( बांधकाम )** 1.13 कोटी, **विकासभार** निधीतून खर्च 6.00 कोटी , **विकासभार भुसंपादनासाठी** 17.50 कोटी, **अतिरिक्त चटई निर्देशांक पोटी प्रिमीयम** रकमेतून कामे करणे 22.93 कोटी, **रेखांकन अंतर्गत सुधारणा**

**(लेआऊट** ) 5.43 कोटी, **रस्ते खोदाई फी मधून रस्ते करणे / दुरूस्ती** रक्कम रू. 18.50 कोटी, **आमदार निधी** रक्कम रू. 18.11 कोटी, **खासदार निधी** रक्कम रू. 4.35 कोटी, **नविन रस्ते विकसीत** करणे रक्कम रू. 15.55 कोटी, अशी एकूण तरतूद करणे बाबत कार्यवाही करावी.

- मा.शासनाच्या जिल्हा नियोजन मार्फत मनपास मागील आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या व चालू आर्थिक वर्षात मिळणा-या अनुदान तरतूदीच्या दृष्टिने नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना या लेखाशिर्षात रक्कम रू. 8 कोटीची वाढ करून रक्कम रू. 18 कोटी तरतूद करण्यात यावे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर )योजना या लेखाशिर्षात रक्कम रूपये 10 कोटीची वाढ करून रक्कम रू. 25 कोटीची तरतूद करण्यात यावी. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती योजना या लेखाशिर्षात रक्कम रूपये 6 कोटीची वाढ करून रक्कम रू. 17 कोटीची तरतूद करण्यात यावी.
- विकासभार भूसंपादन या लेखाशिर्षात विकासभार पोटी जमा होणा-या रकमेपैकी 75 टक्के रक्कम भरणेबाबतची कार्यवाही स्वतंत्र खाते उघडून कार्यवाही करण्यात यावी.
- मा.शासनाकडून महानगरपालिकेस विशेष रस्ता अनुदान मंजूर झाल्याने विशेष रस्ता अनुदान या लेखाशिर्षात जमा व खर्च बाजूस 20 कोटीची तरतूद करण्यात यावी.
- पाणी पुरवठा विभागाने मागणी केल्यानुसार पाणी पुरवठा सर्वेक्षण करणे / हायड्रोलिक व्यवस्था या लेखाशिर्षात रक्कम रू; 25 लाखाने वाढ करण्यात यावी.
- अमृत अभियान अंतर्गत पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत झाल्यानंतर मुळा नगर येथील पंप हाऊस मध्ये 725 एचपी (स्टॅण्ड बाय ) क्षमतेचा पंप व मोटार , विद्युत कामे व इतर अनुषंगिक कामे करण्यासाठी ही सभा मान्यता देत आहे. प्रशासनाने याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करावी. त्यासाठी लेखाशिर्ष तयार करून रक्कम रूपये 1 कोटी तरतूद करण्यात यावी.
- नळ कनेक्शन बदलणे या लेखाशिर्षात रक्कम रू. 10 लाखाची तरतूद करण्यात यावी.
- प्रकल्प विभागासाठी एल.एम.ओ. प्रकल्प चालविणे / देखभाल दुरूस्ती करणे असे नविन लेखाशिर्ष तयार करून त्यामध्ये रक्कम रू. 20 लाखाची तरतूद करण्यात यावी.
- सी आणि डी वेस्ट डिमोलेशन पाडकाम प्रक्रिया प्रकल्प चालविणे व देखभाल दुरूस्ती करणे असे नविन लेखाशिर्ष तयार करून त्यामध्ये रक्कम रू. 50 लाखाची तरतूद करण्यात यावी.
- मा.स्थायी समितीने अंदाजपत्रकामध्ये विकास कामे लेखाशिर्षनिहाय प्रस्तावित केलेली आहेत. सदरची सर्व कामे रद्द करण्यात येत आहे. त्याप्रमाणे संबंधीत विभागाने नोंद घ्यावी.

- शहरातील मुख्य चौक सुशोभिकरण, शहरातील मुख्य रस्त्यावरील डिव्हायडर सुशोभिकरण खाजगी संस्था, कंपनी, सामाजिक संस्था, यांचे मार्फत करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी. यास ही सभा मान्यता देत आहे. त्यामुळे परिसर देखील सुशोभित होईल
- रसिक ग्रुप अहमदनगर यांना सांस्कृतिक कार्यक्रमासाठी रक्कम रूपये 4 लाख व नगर जल्लोष ट्रस्ट, अहमदनगर यांना सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यासाठी रक्कम रूपये 4 लाख तसेच पटवर्धन प्रतिष्ठान अहमदनगर यांना सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यासाठी रक्कम रूपये 1.50 लाख मागणी केल्यानुसार अर्थ सहाय्य देण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच मागणी केलेल्या संस्थाचे धर्मदाय आयुक्त यांचेकडील नोंदणीकृत असले बाबत कागदपत्र, ताळेबंद व चार्टड अकौंट यांचेकडील हिशोब तपासणी आदी आवश्यक कागदपत्रांची खातरजमा करूनच संस्थाना अर्थ सहाय्य देणे बाबत कार्यवाही करणेत यावी. सदरचा खर्च सामाजिक संस्थांना देणगी या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावी.
- मा.सदस्य यांनी सभागृहात केलेल्या चर्चे नुसार मा.शासनाकडून विविध विकास कामांसाठी विविध योजने अंतर्गत मनपास निधी मंजूर करण्यात येतो. सन 2022-2023 व 2023-2024 साठी प्राप्त होणा-या मुलभूत / प्राथमिक सोयी सुविधा विकास निधी, रस्ता अनुदान, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर), आण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना, अल्पसंख्याक बहुलक्षेत्र विकास निधी, नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना निधी, नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत निधी, 15वा वित्त आयोग तसेच महानगरपालिका निधी व इतरही मा.शासनाच्या महानगरपालिकेस प्राप्त होणा-या निधीतील कामे सुचित करण्याचा अधिकार मा.महापौर यांना देण्यात येत आहे यास ही सभा मान्यता देत आहे.
- मा.सदस्य यांनी सभागृहात उपस्थित केलेल्या सुचने नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या दैनिक राज्य राष्ट्रीय हिंदी व इंग्रजी पातळीवरील वर्तमानपत्रात देण्यात येणा-या जाहिरातींच्या बिलांना एक वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्याने सदर देयकास मा.महासभेची मान्यता आवश्यक असल्याने या प्रस्तावास मा.स्थायी समिति सभा क्र. 11 विषय क्र. 144 दि. 6/2/2023 अन्वये मंजूरी दिलेल्या बिलास मान्यता देण्यात येत आहे. संबंधीत विभागाने याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करावी.
- आस्थापना विभागाच्या मागणीनुसार कोव्हीड 19 अनुदान खर्च या लेखाशिर्षातील 7 कोटी रक्कम कमी करून रक्कम रूपये 3 कोटी करण्यात यावी.
- कोव्हीड 19 कर्मचारी सानुग्रह सहाय्य अनुदान असे नविन लेखाशिर्ष तयार करून या लेखाशिर्षामध्ये 7 कोटीची तरतूद करण्यात यावी.

- अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये मोठया प्रमाणात वृक्षरोपण करण्यात येणार असून यासाठी वृक्षकरापोटी जमा होणारी रक्कम स्वतंत्र खाते उघडून त्यामध्ये भरण्याबाबत कार्यवाही करावी.
- अग्निशमन कर या लेखाशिर्षात रक्कम रू. 51 लाखाने वाढ करण्यात यावी.
- शहर सौदर्यीकरण या स्पर्धेमध्ये महानगरपालिकेने भाग घेतला असून शहर सौदर्यीकरणास मा.राज्य शासनाकडून स्पर्धेमध्ये मनपास पारितोषिक मिळू शकते याकरिता रक्कम रूपये 5 कोटीची तरतूद करण्यात यावी. तसेच शहर सौदर्यीकरण करण या लेखाशिर्षात खर्च बाजूस रक्कम रू. 3 कोटीने तरतूद वाढविण्यात यावी.
- वाढीव हद्दीत पाइपलाईन टाकणे या लेखाशिर्षामधे रक्कम रु, 50 लाख कमी करण्यात यावे व केडगाव हद्दीत पाइपलाईन टाकणे या लेखाशिर्षामधे रक्कम रु.50 लाख तरतुद करण्यात यावी.

सन 2022-2023 चे सुधारित व सन 2023-2024 सालचे मुळ अंदाजपत्रक मा.स्थायी समितीने केलेल्या शिफारशी त्याबाबत मा.महासभेत झालेली चर्चा त्यामध्ये अंदाजपत्रकाच्या प्रस्तावात मा.महासभेने सुचित केलेले बदल, दुरूस्त्या व फेर फार यासह ऑफिस रिपोर्ट मंजूर. खर्च मंजूर. नियमाप्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करावी. या सभेचे इतिवृत्त कायम होण्याची प्रतिक्षा न करता कार्यवाही करावी यास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच अंदाजपत्रकाच्या 200 प्रती छापून घेण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देण्यात येत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री. गणेश (उमेश) खंडेराव कवडे

अनुमोदक - मा.श्री.सचिन चंद्रशेखर शिंदे

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७** **प्रस्ताव क्रमांक : ४७** **दिनांक:- २७/०३/२०२३**

-----------------------------------------------------------------------------------------

**प्रस्तावाचा विषय :-** मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

सौ.आशा शिवाजीराव कराळे माझी तब्येत ठीक नसल्याने बुधवार दिनांक 29/03/2023 च्या अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू शकत नसलेबाबत रजेचा अर्ज मंजूर करणेबाबत...

---*---

**ठराव :**

नोंद घेण्यांत येत आहे.

सुचक : मा.श्री.उमेश (गणेश) खंडेराव कवडे

अनुमोदक :मा.श्री.परसराम बाळु गायकवाड,

ठराव सर्वानुमताने मंजूर.

महापौर,<br>
अहमदनगर महानगरपालिका.

| | |
|---|---|
| | **अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**<br>**नगरसचिव विभाग** |

कार्यालयीन आदेश. जा.क्र.नगरसचिव.-

दिनांक : २० / ०३ /२०२३

संबंधीत खाते प्रमुख व शाखा प्रमुख,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस.-

कळविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभा **सोमवार दिनांक २७-०३-२०२३ रोजी दुपारी १.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी आपल्या नावासमोर दर्शविलेल्या कामाची आपण पुर्तता करावी.

उपायुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत :-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख | : | महानगरपालिका सभागृहाचे आसपासचे भागाची साफसफाई करुन घेण्याबाबत संबंधितांस सुचना द्याव्यात. |
| २) | प्रसिध्दी अधिकारी | : | बैठकीची सुचना व विषयपत्रिका या सोबत जोडली आहे. त्याची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रात त्वरीत प्रसिध्द करावी व प्रसिध्दीचे २ (दोन) अंक इकडेस पाठवावेत. सदरच्या येणा-या खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. |
| ३) | श्री.दत्तात्रय ढवळे,स्वीय सहाय्यक, आयुक्त कार्यालय, | | आपण सभेपुर्वी महानगरपालिका सभागृहात उपस्थित राहुन संपुर्ण सभेचे प्रोसिडींग घेण्याचे काम करावे. |
| ४) | इलेक्ट्रीक विभाग प्रमुख | : | वरीलप्रमाणे नोंद घेवून महानगरपालिका सभागृहातील सभेकरीता लाईट व लाऊड स्पीकरची व्यवस्था करण्यात यावी. तसेच नेहमीप्रमाणे टेपरेकॉर्डची सुध्दा व्यवस्था करण्यात यावी. सदर दिवशी विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| ५) | श्रीमती.निकम, नगरसचिव कार्यालय | : | महानगरपालिका सभागृहात राष्ट्रगीत म्हणणे करीता सभेपुर्वी उपस्थित रहावे. |
| ६) | मनपा हवालदार | : | वरील प्रमाणे नोंद घेवुन महानगरपालिका सभागृहात आवश्यक ती पुर्तता करावी. |
| ७) | उद्यान विभाग प्रमुख | : | सदर दिवशी एक बुकेची व्यवस्था करावी. |

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.

**अहमदनगर महानगरपालिकेची सभा सुचना क्रमांक ०७, सोमवार दि. २७/०३/२०२३ रोजीचा अर्थसंकल्पीय सर्वसाधारण होणा-या सभेचा अजेंडा वाटप करण्यास मिळाले बाबत स्वाक्षरी.**

---*---

| पान क्रमांक | नांव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | श्री.बाळासाहेब भोर | |
| २ | श्री.उन्मेश क्षिरसागर | |

| | | |
|---|---|---|
| ३ | श्री.निलाखे प्रदीप | |
| ४ | श्री.तांबे महेश | |

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

कार्यालयीन आदेश.

जा.क्र.नगरसचिव.-
दिनांक : २०/०३/२०२३.

१) श्री.सुभाष ढगे, स्थायी समिती कार्यालय,
२) श्री. शांतवन बडेकर, उपायुक्त कार्यालय,
३) श्री.राजु दळवी,आयुक्त कार्यालय

४) श्री.आकाश घुले, सभागृह नेता कार्यालय,
५) श्री.बाबासाहेब गुंड, महापौर कार्यालय
६) श्री.प्रदिप निलाखे, म.बा.क.समिती कार्यालय
अहमदनगर महानगरपालिका.

यांस.-

आदेशीत करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभा **सोमवार दिनांक २७-०३-२०२३ रोजी दुपारी १.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी आपण सकाळी १०.०० वाजता कार्यालयीन गणवेशात हजर रहावे व मनपा हवालदार यांच्या सूचनेनुसार काम पहावे.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : महानगरपालिका हवालदार, अहमदनगर महानगरपालिका यांस माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
नगरसचिव विभाग.-
दिनांक :        /०४/२०२२.

विषय : सोमवार दिनांक - २७ / ०३ /२०२३ रोजी दुपारी १.०० वाजता झालेल्या मा.अर्थसंकल्पीय सभा सुचना क्रमांक ०७ चहापान खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत...

सादर,

विनंती रिपोर्ट की, महाराष्ट्र शासनाचे शासन परिपत्रक क्रमांक एम.सी.ओ. ४६८५-१८८२ सी. आर.६८-८६-युडी-१४ दिनांक २९ जुलै १९८६ अन्वये कळविले आहे की, चहा व इतर पदार्थांचे दर बदलत असतात म्हणून चहापानाचे कमाल दर परिपत्रकान्वये ठरवून देण्याची आवश्यकता वाटत नाही. कौन्सीलच्या सांविधीक समितीच्या बैठकीसाठी मनपा/नपा यांनी चहापानाचा खर्च आकस्मिक निधीतून (कॉन्टीजन्सी एक्सपेंन्डीचर) किती करावा हे प्रत्येक नगरपालिकेने ठरवावे त्याप्रमाणे खर्च करावा, अशी तरतूद आहे.

अहमदनगर महानगरपालिका सर्वसाधारण सभा क्र. १ दिनांक १७/०२/२०१२ अन्वये अहमदनगर महानगरपालिका खास सभा/सर्वसाधारण सभेचा चहापान खर्च रक्कम रु. १८,०००/- करणेत आला आहे. अहमदनगर महानगरपालिकेची मा.अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक २७/०३/२०२३ रोजी दुपारी १.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर येथे झाली आहे. सदर सभेमध्ये मा.सभापती, स्थायी समितीने, मा.महापौर साहेब यांचेकडेस सादर केला व सदरहु अर्थसंकल्पीय सभा दिनांक २९/०३/२०२२ रोजी घेण्यांत आली आहे.

सदर अहमदनगर महानगरपालिकेच्या सभागृहात आयोजित केलेल्या या सभेस उपस्थित सभासदांचे चहापानाकरीता रक्कम रु.१५,०५०/- (अक्षरी रक्कम रुपये पंधरा हजार पन्नास फक्त) च्या झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळावी, सदरचा खर्च नगरसचिव विभागाच्या* **सभेचे चहा नाष्टा बील** * या लेखाशिर्षाअंतर्गत दर्शविण्याच्या मान्यतेस्तव तसेच सदरचा खर्च श्री.किशोर कानडे, लिपीक टंकलेखक, अहमदनगर महानगरपालिका यांनी केला असुन सदरचा धनादेश श्री.किशोर चंद्रकांत कानडे, अहमदनगर महानगरपालिका यांचे नांवे काढणे बाबत मुख्यलेखाधिकारी यांना आपलेस्तरावरुन आदेश होणेस विनंती आहे.

| | | |
|---|---|---|
| **तरतुद** | **:** | **४,००,०००/-** |
| **पुर्वीचा खर्च** | **:** | |
| **हया बीलात दाखविलेला खर्च** | **:** | |
| **२ व ३ ची बेरीज** | **:** | |
| **उपलब्ध शिल्लक** | **:** | |

नगरसचिव,
नगरसचिव विभाग,
अहमदनगर महानगरपालिका.